कृषीवल
रायगड, शनिवार, दि. ११ मे २०२४
किंमत ४ ₹

## पुढील चार दिवस अवकाळीचा इशारा

**मुंबई :** उष्ण, दमट वातावरणात काहीसा बदल जाणवत असून, काही प्रमाणात उष्णता कमी झाली आहे. दरम्यान, पुढील ४ दिवस राज्यातील बहुतांशी भागात पावसाची अधिक शक्यता आहे. तसेच मंगळवारपर्यंत (दि.१४) वादळी पावसाची शक्यता असल्याचेही भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्रातील मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी मंगळवार १४ मेपर्यंत विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाची शक्यता आहे. दरम्यान, विदर्भ आणि मराठवाड्यातील काही जिह्यांमध्ये गारपीट होण्याची संभावनादेखील आहे. दरम्यान, ४०-५० कि.मी. प्रतितास वेगाने सोसाट्याच्या वारा वाहणार असल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे.




### डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरण

# दोघांना जन्मठेप, तिघे निर्दोष

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्या प्रकरणाची पुण्यातील विशेष न्यायालयाकडून सुनावणी पूर्ण झाली असून, शुक्रवारी (दि. १०) या प्रकरणाचा निकाल जाहीर केला. ११ वर्षांनंतर हे प्रकरण निकाली निघणार असल्याने अवघ्या महाराष्ट्राचे या निकालाकडे लक्ष लागले होते. या प्रकरणातील पाच आरोपींपैकी सचिन अंदुरे, शरद कळसकर यांना दोषी मानून त्यांना जन्मठेप सुनावली आहे. तर, डॉ. वीरेंद्रसिंह तावडे, संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे यांची सबळ पुराव्याअभावी निर्दोष सुटका करण्यात आली आहे.

पान २ वर



विचारवंतांना असलेला धोका अजून संपलेला नाही. माणसांना संपवून विचार संपविता येत नाही. ज्या विचारधारेच्या लोकांवर संशय होता, त्यावर न्यायालयानं शिक्कामोर्तब केलं. मुख्य सूत्रधाराला अटक व्हावी. तिन्हा आरोपींच्या सुटकेविरोधात उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयात जाणार आहोत.

– हमीद दाभोलकर




- २० ऑगस्ट २०१३ : महर्षी विठ्ठल रामजी शिंदे पुलावर डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या.
- पुणे पोलिसांकडून चौकशीला सुरुवात
- मे २०१४ : पुणे पोलिसांकडून सीबीआयकडे तपासाची सूत्रे
- जून २०१६ : सीबीआयकडून दोन वर्षांनी पहिला आरोपी डॉ. वीरेंद्रसिंह तावडेला पनवेलमधून अटक.
- सप्टेंबर २०१६ : डॉ. वीरेंद्रसिंह तावडेवर हत्या आणि हत्येचं षडयंत्र रचल्याप्रकरणी आरोपपत्र दाखल
- ऑगस्ट २०१८ : महाराष्ट्र एटीएस कडून वैभव राऊत आणि शरद कळसकर याला अटक.
- मे २०१९ ; व्यवसायाने वकील असलेले संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावेला डॉ. दाभोलकर हत्या प्रकरणी सीबीआयकडून अटक
- आठ वर्षांनी २०२१ मध्ये सीबीआयने अटक केलेल्या आरोपींविरोधात खटला सुरू
- १० मे २०१४ सुमारे ११ वर्षांनी डॉ. दाभोलकर खटल्याचा निकाल



गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर सचिन अंदुरे, शरद कळसरकर यांना अटक झाली होती. हा तपास एका टप्प्यावर थांबला होता. आज आम्हाला असं वाटतंय की जे खरे शूटर्स होते, त्यांना न्यायालयानं शिक्षा सुनावली ही अत्यंत महत्वाची बाब आहे. ११ वर्षांची ही लढाई महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सर्व कार्यकर्त्यांनी लावून धरली होती. विवेकाच्या मार्गानं जाऊन न्याय दृष्टीपथात येतो ही भावना आमच्या मनात जागृत राहिली आहे. ज्या दोन आरोपींना शिक्षा झाली, त्याबद्दल आम्ही समाधानी आहोत. मात्र, ज्या तिघांना निर्दोष सोडण्यात आलं त्यासंदर्भात आम्ही उच्च आणि सर्वोच्च न्यायालयात जाऊ.

– मुक्ता दाभोलकर

# इंडिया आघाडीचे पारडे जड

### आमदार जयंत पाटील यांचे प्रतिपादन



**। उरण । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीत अनेक प्रचार सभा घेतल्या. राज्यातील जनता आता भाजपवाल्यांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नाही. दहा वर्षे त्यांनी लावल्या तेवढ्या टोप्या पुऱ्या झाल्या. आता राज्यातील जनता हे सहन करणार नाही. इंडिया आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील हे संसदेत जाणार आहेत. उद्याच्या विजयाची माळ उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या गळ्यात पडणार आहे. राहुल गांधी पंतप्रधान झाले, तर मला आनंद होईल. विकास करताना नियोजन पाहिजे. राज्यात महाविकास आघाडीचे पारडे जड दिसत आहे, असे प्रतिपादन शेतकरी कामगार पक्षाचे आमदार जयंत पाटील यांनी केले. मावळ लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांच्या प्रचारासाठी गुरुवारी उरण येथे संध्याकाळी जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. उरण नगरपरिषदेच्या तीर्थरुप नानासाहेब धर्माधिकारी मैदानावर आयोजित करण्यात आलेल्या जाहीर प्रचार सभेत आ. जयंत पाटील बोलत होते.

**उबाठाचे युवा नेते आदित्य ठाकरे यांनी भाजपप्रणित केंद्र व राज्य सरकारच्या कारभारावर चांगलेच टीकेचे आसूड ओढले. दक्षिणेकडील राज्यांनी ठरवले आहे की भाजपला डोक्यावर बसवायचे नाही. उत्तर भारतातही बदल, परिवर्तनाचे वारे वाहात आहेत. महाराष्ट्रातही अशीच स्थिती आहे. त्यामुळे अब की बार ४०० पारची घोषणा करणारे भाजप चंद्रावरून की अमेरिकेतून कुठून ४०० पार करणार, असा रोखठोक सवाल आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला.**

शेतकरी कामगार पक्षाचे मार्गदर्शक नेतृत्व लोकनेते दि.बा. पाटील, शेकापचे ज्येष्ठ नेते प्रभाकर पाटील, माजी विरोधी पक्षनेते ॲड. दत्ता पाटील, माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांनी जिल्ह्यातील जनतेला न्याय देण्यासाठी यशस्वी आंदोलने केली. रायगड जिल्ह्याच्या राजकारणात शेतकरी कामगार पक्षाने महत्त्वाचे योगदान आहे. जेएनपीटी साडेबारा टक्के विकसित भूखंड वाटप, हनुमान कोळीवाडा पुनर्वसन प्रश्न मार्गी लावणार आहोत. लोकसभा निवडणुकीत ४०० पार म्हणणाऱ्या भाजपाला तडीपार करण्यासाठी आता विजयासाठी तुतारी वाजवायची आहे. भाजपाला हात दाखवून मशाल पेटवायची आहे, असे आवाहन आमदार जयंत पाटील यांनी केले.

पान २ वर

# शुक्रवार ठरला 'अपघात'वार

**। खोपोली/पोलादपूर । प्रतिनिधी ।** शुक्रवार रायगड जिल्ह्यातसाठी अपघातवार ठरला. खोपोलीनजीक मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पहाटे झालेल्या विचित्र अपघातात तिघे ठार झाले, तर दहा जखमी झाले. दुसरा अपघात पोलादपूरमध्ये झाला. या अपघातात दोघे जागीच ठार झाले, तर तीन जण गंभीर जखमी झाले आहे. दोन्ही अपघातातील मृतदेह शवविच्छेदन करुन कुटुंबियांच्या ताब्यात देण्यात आले. तर, जखमींवर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या अपघातांचा पोलीस तपास सुरू आहे.

### दोन अपघातात पाच ठार, १३ जखमी





### कंटेनरला कारची धडक

अनेक वर्षांपासून अपघातप्रवण क्षेत्र म्हणून सर्वश्रुत असलेल्या पोलादपूर शहरातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील डॉ. आंबेडकर नगराच्या प्रारंभी शुक्रवारी (दि. १०) सकाळी उभ्या कंटेनरला कारची मागून धडक बसल्याने

पान २ वर

### ब्रेक फेल झाल्याने ट्रकचा अपघात

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शुक्रवारी (दि. १०) पहाटे चार वाजता पाईप वाहून नेणारा ट्रक, कोंबड्या घेऊन जाणारा पिक अप आणि कार ही तीन वाहने एकमेकांवर आदळल्याने भीषण अपघात झाला. या अपघातात तिघांचा मृत्यू झाला असून, दहा जण जखमी झाले आहेत. पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रकचा ब्रेक फेल झाल्याने हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर शुक्रवारी पहाटेच्यासुमारास पाईप घेऊन जाणाऱ्या ट्रकचा

पान २ वर

# दोनच पर्याय होते, तुरुंग किंवा पक्ष बदलणे

### शिंदे गटाचे नेते रवींद्र वायकरांचा गौप्यस्फोट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मला चुकीच्या पद्धतीने भ्रष्टाचाराच्या प्रकरणात गोवण्यात आले होते. तुरुंगात जाणे किंवा पक्ष बदलणे, हे दोनच पर्याय माझ्याकडे शिल्लक होते. त्यामुळे जड अंतःकरणाने मी पक्ष बदलला. माझ्यावर तर दबाव होताच, पण माझ्या पत्नीचेही नाव गोवल्यांतर माझ्यापुढे पर्याय उरला नाही, असा गौप्यस्फोट शिवसेना शिंदे गटाचे नते आणि उत्तर पश्चित मुंबई लोकसभेचे उमेदवार रवींद्र वायकर यांनी केला आहे. एका वृत्तपत्रास दिलेल्या मुलाखतीदरम्यान ते बोलत होते. मुंबईमध्ये २० मे रोजी लोकसभेसाठी मतदान होणार आहे. त्याआधीच वायकर यांनी व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे विरोधकांना मात्र आयताच मुद्दा मिळाला.



रवींद्र वायकरांनी यावेळी आपल्याला भावनांना वाट मोकळी करून दिली.

पान २ वर

# केजरीवालांना 'सर्वोच्च' दिलासा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दिल्लीतील कथित मद्य धोरण घोटाळ्याप्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना दिलासा मिळाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्यांना १ जूनपर्यंत अंतरिम जामीन मंजूर केला आहे. लोकसभा निवडणुकीदरम्यान प्रचार करण्याची परवानगी मिळावी, अशी मागणी करणारी याचिका केजरीवाल यांनी सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर ७ मे रोजी सुनावणी पार पडली.



# घरांपासून आदिवासी बांधव वंचित



- कोल्हारेमधील ३९ कुटुंबं प्रतीक्षा यादीवर
- विजय हजारे आणि तेजस्वी संस्था बांधून देणार घर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कोल्हारे ग्रामपंचायतीमधील अनेक कुटुंबं मागील अनेक वर्षे घरकुलाच्या प्रतीक्षेत आहेत. ३९ लाभार्थी हे लाभाच्या प्रतीक्षेत असून, त्यांना घरकुल मिळत नसल्याने स्थानिक ग्रामपंचायत सदस्य आणि एका स्वयंसेवी संघटनेने दोन आदिवासी कातकरी कुटुंबांना घरकुल बांधून देण्याचा निर्णय घेतला आहे.

कर्जत तालुक्यातील कोल्हारे ग्रामपंचायतीमध्ये कोल्हारे तेथे एक कातकरी समाजाची वस्ती आहे, तर धामोते येथे लायकर समाजाची वस्ती आहे. लोकसंख्येनुसार कर्जत पंचायत समितीकडून एका वर्षाला केवळ तीन घरकुलं मंजूर केली जातात. त्यामुळे कोल्हारे ग्रामपंचायतीची लाभार्थी यादी दरवर्षी वाढत चालली आहे. सध्या या ग्रामपंचायतीमधील इंदिरा आवास योजनेतून घरकुले मिळविण्यासाठी बनविण्यात आलेल्या प्रतीक्षा यादीत तब्बल ३९ कुटुंबांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

पान २ वर

# कर्ज फेडण्यासाठी तरुणाने केली चोरी

### दहा तासांतच पोयनाड पोलिसांकडून गुन्ह्याची उकल

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील पळी येथील दोन ठिकाणी झालेल्या घरफोडीचा गुन्हा पोयनाड पोलिसांनी अवघ्या दहा तासांत उघडकीस आणला. कर्जबाजारी झालेल्या तरुणाने स्वतःच्या व काकाच्या घरात घुसून ही चोरी केल्याचे उघड झाले असून, त्याच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात यश आले.

पळी येथील पाटील कुटुंबियांतील दोन घरांमध्ये घुसून चोरट्याने ८ मे रोजी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास चोरी केली. दोन्ही घरांतील लाखो रुपयांचा ऐवज चोरण्यात आला. भरदिवसा झालेल्या या चोरीचा गुन्हा पोयनाड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल केल्यावर पोलिसांनी शोध घेण्यास सुरुवात केली. सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुश सांगळे, पोलीस उपनिरीक्षक

पान २ वर

# घरकुल योजनेत हेराफेरी




निगडे ग्रामपंचायतीमधील प्रकार उघड

**। पेण । प्रतिनिधी ।**

मोदी आवास योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात देशपातळीवर घरकुल योजना राबविण्यात आली आहे. मात्र, या योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याचे उघड होत आहे. पेण तालुक्यातील निगडे ग्रामपंचायतीमध्ये ३५ लाभार्थ्यांची यादी मंजूर झाली असून, त्यांच्या खात्यावर १५ हजारांप्रमाणे पहिला हप्ताही जमा झाला आहे. मात्र, ३५ लाभार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात हेराफेरी असल्याचे समोर आले आहे.

याबाबत पेण पंचायत समिती येथून घेतलेल्या माहितीनुसार निगडे ग्रामपंचायतीमध्ये २५ जुलै २०२३ रोजी सर्वेक्षण करून ग्रामसभेच्या ठरावाने ४६ जणांच्या नावांची यादी पंचायत समितीला देण्यात आली होती. त्यातील ३५ जणांच्या नावाची यादी मंजूर करण्यात आली. ही यादी १८ सप्टेंबर २०२३ रोजी ग्रामसेवक व सरपंचाच्या सहीने गटविकास अधिकाऱ्यांना दिली. या यादीमधील लाभार्थ्यांमध्ये सरकारी कर्मचारी, मयत व्यक्ती, पक्की घर असणाऱ्या व्यक्तींचा भरणा मोठ्या प्रमाणात होता. ही सर्व बाब ग्रामसेविका विशाखा पेडवी यांना माहिती असूनदेखील त्यांनी सदरील

पान २ वर

निगडे येथील ३५ लाभार्थ्यांची फेरतपासणी करण्याचे आदेश बांधकाम अभियंता सूर्यकांत परब यांना दिले आहेत. जोपर्यंत योग्य लाभार्थी असल्याची खात्री होत नाही, तोपर्यंत आम्ही लाभार्थ्यांचे बंद केलेले खाते पुन्हा चालू करणार नाही. दोषींवर रितसर कारवाई करू.

– भाऊसाहेब पोळ, गटविकास अधिकारी

संपूर्ण मनःशांतीसाठी कंपनी-फिट CNG
Hyundai कंपनीच्या CNG कार अस्सल वॉरंटी, वर्धित सुरक्षा आणि उत्कृष्ट कार्यप्रदर्शन युक्त
Grand i10 NIOS लाभ ₹ 48 000* पर्यंत
AURA लाभ ₹ 33 000* पर्यंत
EXTER लाभ ₹ 10 000* पर्यंत



शक्तिशाली आणि पर्यावरणास अनुकूल पॉवरट्रेन
खास ट्यून केलेले सस्पेन्शन
सुपीरियर CNG टाकी क्षमता Grand i10 NIOS: 60 l (पाणी समतुल्य) AURA : 65 l (पाणी समतुल्य) Exter: 60 l (पाणी समतुल्य)
कॉम्पॅक्ट आणि टिकाऊ इंजेक्टरसह शांत केबिन
डबल स्टेज CNG रेग्युलेटर सह सुरळीत ड्रायव्हिंग
RDE अनुरूप आणि E20 इंधन तयार असलेले
HYUNDAI
3 YEAR 1 00 000km** Warranty Coverage
UPTO 7 YEARS Extended Warranty^
3 YEAR Unlimited** Kilometer Warranty
3 YEARS Road Side Assistance (RSA)#
UPTO 5 YEARS Shield of Trust Running Repair Package
UPTO 5 YEARS Shield of Trust Super Maintenance Package
*For CSD, Government and Corporate Requirements, contact Mr. Joseph Fernandes at jfernandes@hmil.net or 9920209565
Give a missed call on 9555295868
my Hyundai app
Hyundai Promise Certified Pre-Owned Car
Hyundai Cl!ck to Buy Scan here
*Terms & Conditions apply. Benefits include cash discount, exchange bonus and benefits for government or corporate employees, whichever is applicable. Benefits may vary with variants and are subject to change without prior notice. **3-year warranty or upto 1 00 000 km whichever is earlier for Grand i10 NIOS, AURA, i20 & i20 N line. 3-year unlimited km warranty is applicable for VENUE, VENUE N Line, CRETA, ALCAZAR, TUCSON, VERNA, KONA Electric and IONIQ 5. ^Upto 7 years extended warranty is applicable only for petrol variants. HMIL reserves the right to withdraw/modify the scheme without prior notice. Visit your nearest Hyundai dealership for more details. Hyundai urges you to follow traffic rules – these are meant to keep you safe on roads.
विशाल ह्युंदाई पनवेल, Ph: 084228 10904 अलिबाग, Ph: 084228 10907
शरयू ह्युंदाई पेण वडखळ, Ph: 091679 50080, 080473 63111




# शिंदे व पवारांचा लवकरच राजकीय अस्त

## तृणमूल काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते डेरेक ओब्रायन यांचे भाकीत

। कोलकता । वृत्तसंस्था ।

ज्या पक्षाने व नेत्यांनी मोठे केले, त्यांच्या पाठीत खंजीर खुपसणारे नेते मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना महाराष्ट्रातील जनता धडा शिकविणार असून २०२५ मध्ये या दोन्ही नेत्यांचा राजकीय अस्त झालेला पाहायला मिळेल, असे धक्कादायक भाकीत तृणमूल काँग्रेसचे मुख्य राष्ट्रीय प्रवक्ता व राज्यसभेतील तृणमूल काँग्रेसचे नेते डेरेक ओब्रायन यांनी केले.



राज्यसभेत आक्रमकपणे मोदी सरकारवर हल्लाबोल डेरेक ओब्रायन यांनी अनेकदा केला आहे. तृणमूल काँग्रेसचे फायरब्रँड नेता म्हणून त्यांची ओळख आहे. त्यांच्याशी येथील तृणमूल भवनात संवाद साधला. पहिल्यांदा जानेवारी महिन्यात भाजपने ‍मोदी की गॅरंटी म्हणायला सुरुवात केली. त्यानंतर मार्च महिन्यात त्यांचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. त्यावेळीही ते म्हणाले मोदी की गॅरंटी. आता मतदानाचे तीन टप्पे संपल्यानंतर भाजपचे नेते आता ही गॅरंटी विसरले. आता भाषणांमध्ये मोदी की गॅरंटी नाही व अब की बार ४०० पार ही घोषणाही गायब झाली आहे. त्यामुळे या तीन टप्प्यात त्यांची स्थिती किती दयनीय झाली आहे, याची कल्पना येईल, असे डेरेक ओब्रायन म्हणाले.

पश्चिम बंगालच्या २०२१ च्या विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी भाजपला २०० जागा मिळतील, असा दावा केला होता. प्रत्यक्षात ७० जागा मिळाल्या. अमित शहांनी दावा केलेल्या जागांपैकी केवळ एक तृतीयांश जागा भाजपला मिळाल्या होता. या निवडणुकीत ३५ म्हणत आहेत. आता ३५ चे एकतृतीयांश किती होतात, याची आकडेमोड तुम्ही करून घ्या. संदेशखालीच्या मुद्यावरून भाजप रंगेहाथ पकडली गेली आहे. तुम्ही स्टिंग ऑपरेशनचा व्हिडिओ पहा. सर्व काही अगदी सुस्पष्ट झाले आहे. ही सर्व घटना विरोधी पक्षनेते व भाजपचे नेते सुवेंदू अधिकारी यांच्या नेतृत्वात घडवून आणलेली आहे. हा केवळ महिलांचा अपमान नाही तर पश्चिम बंगालच्या लोकांचाही अपमान आहे. याचा फटका भाजपला बशिरहाटच्या मतदानातून दिसून येईल. मतदारच त्यांना धडा शिकवतील. ही जागा आम्ही दोन लाखांच्या मताधिक्यांनी जिंकू.असे डेरेक ओब्रायन म्हणाले.

केंद्र सरकारच्या अनेक योजनांपेक्षा चांगल्या योजना आधीपासूनच पश्चिम बंगालमध्ये सुरू आहेत. तुम्ही आयुष्मान योजनेची गोष्ट करीत असाल. ही योजना लागू होण्यापूर्वी दोन वर्षांपासून पश्चिम बंगालमध्ये स्वास्थ साथी योजना सुरू आहे. या योजनेतून आम्ही अडीच कोटींपेक्षा अधिक लोकांना फायदा दिला आहे. उलट मनरेगा व आवास योजनेसाठी एका पैशाचा निधी केंद्राने पश्चिम बंगालला दिला नाही. आपण संघराज्य संरचना स्वीकारली आहे. त्यांना एक राष्ट्र, एक राज्य, एक निवडणूक, एक भोजन हवे आहे. या विचारधारेच्या विरोधात आम्ही लढतो. भारताची विविधता जपण्यासाठी आम्ही लढत आहोत.

उद्धव ठाकरे व शरद पवार हे दोन्ही नेते भाजपला जबर धक्का देणार आहेत. मी पुन्हा एक महत्त्वपूर्ण भाकीत करतो. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार हे २०२५ पूर्वी संपूर्णपणे संपलेले नेते असतील. या दोन्ही नेत्यांचा राजकीय अस्त होईल.भाजपच्या वॉशिंग मशीनमध्ये घुसलेल्या या नेत्यांना महाराष्ट्रातील जनता धडा शिकविणार आहे. मी महाराष्ट्रावर प्रेम करणारा माणूस आहे. अनेक वर्षे मी महाराष्ट्रात काम केले आहे.

## संविधान बदलाच्या चर्चेचा महायुतीला फटका

**मंत्री उदय सामंत यांचे वक्तव्य**

। मुंबई । वृत्तसंस्था ।

भाजपा यंदा ४०० जागा जिंकली तर यंदाची लोकसभा निवडणूक ही अखेरची असेल, असा दावा विरोधक करत आहेत. तसेच आम्ही ही निवडणूक केवळ देशातील लोकशाही आणि संविधान वाचवण्यासाठी लढतोय, असा प्रचारही विरोधक करत आहेत. विरोधकांच्या या प्रचाराचा सत्ताधारी भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांना फटका बसत असल्याचं वक्तव्य राज्याचे उद्योगमंत्री आणि शिवसेनेच्या शिंदे गटातील नेते उदय सामंत यांनी केलं आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सामंत यांनी मान्य केलं आहे की, विरोधकांनी संविधानावरून सुरू केलेल्या प्रचाराचा महाराष्ट्रात महायुतीला फटका बसत आहे.

लोकसभा निवडणुकीत भाजपाने अब की बार ४०० पार असा नारा दिला आहे. भाजपाप्रणित एनडीएने निवडणुकीत ४०० जागा जिंकण्याचं ध्येय डोळ्यांसमोर ठेवलं आहे. भारतात सत्तास्थापन करण्यासाठी केवळ २७३ जागांची आवश्यकता असते. मागील दोन्ही निवडणुकीत भाजपाने बहुमत मिळवलं होतं. २०१४ च्या निवडणुकीत भाजपाने २८२, तर २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ३०२ जागा जिंकल्या होत्या. मात्र यावेळी भाजपाने थेट ४०० जागा जिंकण्याचा संकल्प केल्यामुळे विरोधकांकडून भाजपाच्या हेतूंवर संशय व्यक्त केला जात आहे.

### वे|ध|क

## शेकडो मतदान कार्ड कचऱ्यात

**जालना :** जालन्यात लोकसभा निवडणुकीसाठी चौथ्या टप्प्यात मतदान पार पडणार आहे. येत्या सोमवारी, १३ मे रोजी इथं मतदान होत आहे. पण तत्पूर्वीच शेकडो मतदान कार्ड इथं कचऱ्यात फेकून देण्यात आल्याचं समोर आलं आहे. हा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर याची चौकशी केली जात आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर मतदान कार्ड रस्त्याच्या कडेला असलेल्या कचराकुंडीजवळ एकगठ्ठा स्वरुपात फेकून देण्यात आल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे. हा व्हिडिओ जालना शहरातील असल्याचं सिद्ध झालं आहे.

पण ही कार्ड अशा पद्धतीनं काय फेकून देण्यात आली आहेत, याचं कारण अद्याप समोर आलेल नाही. इतक्या मोठ्या प्रमाणावर मतदान कार्ड कचऱ्यात फेकून देण्यात आल्यानंतर आता त्यातील फोटो, नाव, पत्ता यावरुन संबंधित व्यक्तींची ओळख पटवण्यात येत आहे. परंतू ही मतदान कार्ड खरी आहेत की बनावट आहेत? असाही प्रश्न उपस्थित केला जात आहे. त्याचबरोबर या लोकांना मतदान करता येऊ नये, म्हणजेच मतदान प्रक्रियेत अडथळा निर्माण करण्याच्या हेतूनं ही कार्ड फेकून देण्यात आल्याची चर्चाही रंगली आहे.



■ मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ मोहोपाडा येथे इंडिया आघाडीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांची आज आढावा बैठक पार पडली. यावेळी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, खालापूरचे शेकाप नेते संतोष जंगम, मोहोपाडा परिसरातील शेकापसह इंडिया आघाडीसह सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## अमोल कोल्हे महाराष्ट्राचा स्वाभिमान : सुप्रिया सुळे

। पेठ । वृत्तसंस्था ।

शिरूर लोकसभा मतदारसंघातील नागरिकांना बाके वाजविणारा खासदार पाहिजे की कांदा बाजारभावावर बोलणारा खासदार पाहिजे? मेरिट बघून पुन्हा एकदा या भागाचा प्रतिनिधी म्हणून अभ्यास आणि कर्तृत्ववान डॉ. अमोल कोल्हे यांना आशीर्वाद द्या. महाराष्ट्राचा स्वाभिमान म्हणून डॉ. अमोल कोल्हे यांना लोकसभेत पाठवा. आमच्याकडे पैशाची अतिवृष्टी झाली. तुमच्याकडेही होईल. त्यांना पकडा व पोलिसांकडे द्या. सगळ्या बँकांवर लक्ष ठेवा. धमक्यांना घाबरू नका,असे आवाहन खासदार सुप्रिया सुळे यांनी केले.



पेठ (ता. आंबेगाव) येथे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारासाठी आयोजित केलेल्या सभेत सुप्रिया सुळे बोलत होत्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष देवदत्त निकम, बाळासाहेब बाणखेले, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुरेश भोर, तालुका प्रमुख दत्ता गांजाळे, काँग्रेसचे राजू इनामदार, विक्रम भोर, पूजा वळसे पाटील, सुरेखा निघोट, अल्लू इनामदार, भारती शेवाळे आदी उपस्थित होते.

लोकसभेत कांद्याच्या भावाबाबत मी आणि अमोल कोल्हे यांनी प्रश्न उपस्थित केल्यानंतर आम्हाला निलंबित केले जाते. कांद्याला हमीभाव मागणे, हा गुन्हा आहे का? केंद्रातील सरकार शेतकरी आणि कामगार विरोधी आहे. या देशातील एकही कामगार कायम होणार नाही, हे केंद्र सरकारने आणलेले काळे कायदे मी आणि अमोल कोल्हे यांनी हाणून पाडले आहेत.

वीज, पाणी, शाळा, अंगणवाडी, बँक, एमआयडीसी, रस्ते, कारखाने काँग्रेसच्या काळात झाले. मग तुमच्या पदरात या सरकारने काय टाकले? महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार याबाबत केंद्रातील सरकार बोलत नाही, असा आरोप सुप्रिया सुळे यांनी केला.

# संजोग वाघेरे बहुमतांनी निवडून येणार

## तालुका चिटणीस विकास नाईक यांचा विश्वास

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे मावळ लोकसभा मतदार संघातील निवडणुकीच्या रिंगणात उभे राहिले आहेत. त्यांच्या उमेदवारीने कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह निर्माण झाला आहे. कार्यकर्त्यांकडूनदेखील त्यांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत आहे. वाघेरे या निवडणुकीत बहूमतांनी निवडून येतील असा विश्वास शेकाप उरण तालुका चिटणीस विकास नाईक यांनी व्यक्त केला.



मावळ लोकसभा मतदार संघातील निवडणूक प्रतिष्ठेची ठरत आहे. या निवडणुकीत संजोग वाघेरे यांच्या प्रचारार्थ शेकापचे नेते आ. जयंत पाटील, माजी आ. बाळाराम पाटील यांच्यासह इंडिया आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने कामाला लागले आहेत. शेतकरी कामगार पक्षासह इंडिया आघाडी प्रचारात आघाडी घेत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

शेकाप पदाधिकारी व कार्यकर्ते गावोगावी जाऊन वेगवेगळ्या बैठकीच्या माध्यमातून वाघेरे यांना मतदान करण्याचे आवाहन करीत आहेत. वाघेरे यांच्या पाठीशी शेतकरी कामगार पक्ष ठाम उभा राहिला आहे. इंडिया आघाडीचे सर्व कार्यकर्ते प्रचारात सामील होत आहेत. त्यामुळे प्रचाराच्यावेळी वाघेरेंना मतदारांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. गाववाड्यांमध्ये त्यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. शेकाप नेते आ. जयंत पाटील यांच्या आवाहनानंतर उरण तालुक्यातील शेकाप कार्यकर्ते कामाला लागले आहेत. रात्रीचा दिवस करून प्रचार करीत आहेत. संजोग वाघेरे यांचे जल्लोषात स्वागत केले जात आहे. मतदारांसह कार्यकर्ते त्यांच्या स्वागतासाठी स्वंयस्फुर्तीने पुढे येत आहेत. पुर्वी रामराज्याच्या काळात जनतेचे राज्य होते. जनतेच्या हितासाठी काम केले जात होते. परंतु देशात, राज्यात रामराज्याच्या नावाखाली मते मिळविण्याचा घाट महायुतीसह भाजपने घातला आहे. देशात, महागाई, बेकारी, गुन्हेगारी वाढत आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनता त्रस्त झाली आहे. या निवडणुकीत उभे राहिलेले महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्यावर प्रचंड नाराजी आहे. त्यामुळे या निवडणुकीत वाघेरे बहूमतांनी निवडून येतील असा विश्वास आहे, असे शेकाप उरण तालुका चिटणीस विकास नाईक यांनी व्यक्त केला.

## आघाडीचे फ्लेक्स युद्ध रंगले

**भुसावळ :** येथे लोकसभा निवडणूक प्रचाराला शेवटच्या टप्प्यात चांगलाच रंग भरला असून महायुती व महाविकास आघाडीचे फ्लेक्स युद्ध चांगलेच रंगले आहे. विशेष म्हणजे उमेदवारासोबतच आजी-माजी आमदारांचा फोटो ठळकपणे छापले आहेत. रावेर मतदारसंघात एकूण २४ उमेदवार रिंगणात आहेत. मात्र महायुतीच्या उमेदवार रक्षा खडसे व महाविकास आघाडीचे उमेदवार श्रीराम पाटील यांच्यात सरळ लढत आहे. सोबतच वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संजय ब्राह्मणे हे देखील जोरात प्रचार करत आहेत. प्रमुख उमेदवार प्रचार फेऱ्या, कोपरा सभा आदींबरोबरच मोठे फ्लेक्स लावून देखील प्रचार करीत आहेत.

पान १ वरुन

## इंडिया आघाडीचे पारडे जड

लोकसभा निवडणुकीत भाजप विरुद्ध भारत अशी लढाई आहे. संविधान वाचवण्यासाठी ही लढाई आहे. देश, महाराष्ट्र विरोधी भाजप आहे. त्यामुळे देशभरातील विविध राज्यात केंद्र सरकारचे अत्याचार वाढतच चालले आहेत. भाजपचे प्रज्वल रेवण्णा यांनी घरातील आणि पक्षातील हजारो महिलांचा अमानुषपणे छळ करुन बलात्कार केला.अशा रेवण्णाच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी गेले होते. मतदान झाल्यानंतर त्याला विदेशात पळून जाण्यासाठीही त्यांनी मदत केली असल्याचा गंभीर आरोप आदित्य ठाकरे यांनी भाषणातून केला. २०२२ मध्ये गद्दारी, पक्ष फोडाफोडी करण्याच्या भाजपच्या गलिच्छ राजकारणाविरोधात लढत आहोत. गद्दारीने राज्याच्या सत्तेवर आलेल्यांमध्ये काही मंत्री भ्रष्टाचारांनी बरबरटले आहेत. उत्तर प्रदेशातही महाराष्ट्राप्रमाणेच पलटीराम निघाले आहेत. ३७० कलम रद्द करुनही काश्मीरमधील ना दहशतवाद संपला, ना पंडितांना चांगले दिवस आले, ना भरभराट झाली. आज तिथे परिस्थिती गंभीर आहे. त्यामुळे मात्र भाजपला निवडणुकीत उमेदवारही मिळाले नाहीत. लडाखला राज्याचा दर्जा मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचा दावाही आदित्य ठाकरे यांनी भाषणातून केला.

नवीमुंबई विमानतळाला तुम्ही दि.बा. पाटील यांचे नाव का देत नाहीत. संभाजीनगरातील विमानतळाला छत्रपती संभाजी महाराज नाव का देत नाही. अशा महाराष्ट्र व्देषी भाजपाला या महाराष्ट्र व्देषी मिंधे सरकारला तुम्ही मतदान करणार का? हेच नाही तर आपले उद्योगधंदे गुजरातला घेऊन गेले आहेत. त्यामुळे आता केंद्र सरकार बदलायचे आहे. महाराष्ट्रातील तरुणांचा हक्काचा रोजगार तुम्ही गुजरातला नेणार तर आम्ही तुम्हाला नडणारच. त्यामुळे आता महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करुन महाराष्ट्राचा, देशाचा अंधकार दूर करून टाका, असे आवाहनही आदित्य ठाकरे यांनी यावेळी केले.

यावेळी माजी खासदार अनंत गीते, जितेंद्र आव्हाड, बबन पाटील, जिल्हा प्रमुख माजी आमदार मनोहर भोईर, जेएनपीए कामगार ट्रस्टी दिनेश पाटील, नरेश रहाळकर, काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, मिलिंद पाडगावकर, शिवसेना उरण तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, तालुका अध्यक्ष विनोद म्हात्रे, उरण उत्कर्ष सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गोपाळ पाटील, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रशांत पाटील, भावना घाणेकर आणि महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## .. तुरुंग किंवा पक्ष बदलणे

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या वेळेपासून मी हाती शिवबंधन बांधले. बाळासाहेबांच्या शिवसेनेत ५० वर्ष राहिल्यानंतर मला उद्धव ठाकरेंची साथ सोडावी लागली. परंतु नियतीने माझ्यासमोर प्रश्न निर्माण केले होते. नियती कसा बदल घडवून आणते, असे रवींद्र वायकर म्हणाले.

आपल्यावर झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपाबाबत बोलताना वायकर म्हणाले, माझ्याविरोधात झालेली तक्रार ही फौजदारी स्वरुपाची नव्हतीच. मला सर्वोच्च न्यायालयापर्यंत जावे लागले. माझे प्रकरण राजकीय होते, असे वकिलांनीही मला सांगितले. माझ्या मदतीसाठी कुणीही पुढे आले नाही. त्यामुळे माझ्यासमोर दुसरा पर्याय नव्हता.

## घरकुल योजनेत हेराफेरी

यादी पंचायत समिती पेण येथे दिली. घरकुलांची अंतिम यादी झाल्यानंतर या यादीची पडताळणी न करता ३५ लाभार्थ्यांच्या खात्यावर १५ हजारांप्रमाणे २८ फेब्रुवारी २०२४ रोजी योजनेचा पहिला हप्ता जमा झाला. मात्र, निगडे गावातील जागरुक नागरिकांना हे लक्षात आले की, ज्यांना खरंच लाभ द्यायचे होते, ते लाभार्थी वंचित राहिले असून, ज्यांची घरं पक्की आहेत, त्यांना मोदी आवास घरकुल योजनेचा लाभ मिळाला आणि तशा प्रकारची तक्रार गटविकास अधिकारी यांच्याकडे केली. गटविकास अधिकारी यांना ग्रामसेविकेने केलेली चूक लक्षात आणून देताच त्यांनी तातडीने सर्वच्या सर्व म्हणजेच ३५ खाती तात्पुरती बंद केली.

**ग्रामसेविकेचा बोलण्यास नकार दिला**

निगडे ग्रामपंचायतीच्या ग्रामसेविका विशाखा पेडवी यांना आमच्या प्रतिनिधींनी संपर्क करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना संपर्क होत नव्हता. अखेर पेण पंचायत समितीचे वरिष्ठ लिपिक संजय कांबळे यांनी त्यांना संपर्क करून आपण कुठे आहात अशी विचारणा केली तेव्हा मी ग्रामपंचायतमध्ये पोहोचत आहे असे उत्तर दिले. परंतु ११.३० वाजले तरी त्या ग्रामपंचायतीमध्ये पोहोचल्या नाही. अखेर पुन्हा संपर्क करून विचारणा केली की, मोदी आवास घरकुल लाभार्थ्यांच्या योजनेची यादी तयार करत असताना आपण योग्य लाभार्थी आणि अयोग्य लाभार्थी याविषयी ग्रामसभेशी बोलणे केलेत का? तेव्हा त्यांनी उत्तर देण्यास टाळले. तसेच सचिव म्हणून आपली जबाबदारी काय हेसुध्दा सांगण्यास त्यांनी टाळले.

## दोघांना जन्मठेप, तिघे निर्दोष

पुण्यातील महर्षी शिंदे पुलावर २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. दाभोलकर यांची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. या गोळीबारामध्ये डॉ. दाभोलकर यांचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेनंतर राज्यभरात खळबळ उडाली होती. डॉ. दाभोलकर यांच्या हत्येचा सुरुवातीचा तपास पुणे पोलिसांनी केला. त्यानंतर एटीएसने हा तपास पुढे सुरू ठेवला. त्यानंतर एटीएसकडून हा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) वर्ग करण्यात आला होता.

## ...ट्रकचा अपघात

(क्र. के-५६-३२७७) ब्रेक फेल झाला. त्यामुळे चालक बालाजी वडर (२६) याचे ट्रकवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे तो ट्रक पुढे कोंबड्या घेऊन जाणाऱ्या पिक अप टेम्पोवर (एमएच-०३-सीपी-२४२८) जाऊन आदळला. त्यामुळे पुढे चालणाऱ्या ओम्नी गाडीला (एमएच-११-वाय-७८३२) त्याची जोरात धडक बसली. या अपघातात ओम्नी कारमधील चालकासह पाच जणांपैकी दोघांचा मृत्यू झाला. त्यात एका महिलेचा समावेश आहे, तर दोन जाण गंभीर जखमी असून, चालक किरकोळ जखमी झाला आहे. तसेच कोंबड्या वाहून नेणाऱ्या टेम्पोमधील चालकासह चार जणांपैकी दोन गंभीर, तर दोन जण किरकोळ जखमी आहेत. ट्रकमधील चालकासह तिघांपैकी एकाचा मृत्यू झाला, तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल, पनवेल आणि खोपोली नगरपालिका रुग्णालयात रवाना करण्यात आले आहे. तसेच मृतदेह कार्यवाहीसाठी पुढे पाठवण्यात आले आहेत.

अपघात ठिकाणी मदतीसाठी आयआरबीकडील देवदूत टीम, आयआरबी पेट्रोलींग टीम, मृत्युंजय दूत, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्था, डेल्टा फोर्स, महाराष्ट्र सुरक्षा बलाचे जवान, लोकमान्य हॉस्पिटल ॲम्ब्युलन्स सेवा, महाराष्ट्र शासनाची १०८ ॲम्ब्युलन्स सेवा यांनी मदतकार्य केले. दरम्यान, महामार्ग वाहतूक पोलीस-बोरघाटचे अधिकारी आणि कर्मचारी, खोपोली पोलीस ठाण्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी घटनास्थळी धाव घेऊन परिस्थिती नियंत्रणात आणली. अपघात झाल्यानंतर काही वेळासाठी वाहतूक बाधित झाली होती. मात्र, तात्काळ मदतकार्य पूर्ण करून वाहतूक खुली करण्यात आली.

## कंटेनरला कारची धडक

अपघात होऊन कारमधील दोघे ठार, तर तिघे गंभीर जखमी होऊन अत्यवस्थ झाले. यामुळे या ठिकाणी जीवघेण्या अपघातांची खंडित मालिका सुरू झाल्याची साशंकता या अपघातामुळे पोलादपूरांमध्ये निर्माण झाली आहे. मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग दोनपदरी असताना पोलादपूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगरासमोर अनेक वर्षांपासून अपघातप्रवण क्षेत्र अस्तित्वात होते आणि तेथे होणारे अपघात जीवघेणे असत. मात्र, चौपदरीकरणामुळे या अपघात घडण्याच्या घटना कमी होऊन तीव्रतादेखील कमी झाल्याची भावना पोलादपूरकरांमध्ये निर्माण झाली होती. मात्र, या अपघातप्रवण क्षेत्रात स्वामी समर्थ मंदिरासमोर सकाळी सव्वाअकरा वाजण्याच्या सुमारास येथे गोवा दिशेने जाण्यासाठी उभ्या असलेल्या कंटेनरला (एनएल ०१ एई ३१५०) भरधाव वेगाने कोकणाकडे जाणाऱ्या होंडा बीआरव्ही कार (एमएच ०३ सीएस ११७७) ची मागील बाजूने धडक बसून कारमधील चालक आणि कडेला बसलेली महिला असे दोघेजण जागीच ठार झाले, तर मागील सीटवर बसलेल्या तिघांनाही अतिशय गंभीर स्वरूपाच्या जखमा होऊन ते अत्यवस्थ झाले. अपघातात होंडा बीआरव्ही कारच्या दोन्ही एअरबॅग्ज उघडून त्या कंटेनरचे बीम घुसल्याने फुटल्या. यामुळे पोलादपूर पोलिसांकडून अधिक माहिती प्राप्त करता चालक अनिल भीमा शिंदे (४०, रा. पुणे) व सुमती यशवंत शिंदे (७५, रा. पुणे) हे दोघे जागीच ठार झाले, तर जखमी झालेले निलेश अनंत दळवी (५०), जानवी निलेश दळवी (४५), यश निलेश दळवी (१८) तिघेही खानवली, ता. लांजा येथील रहिवासी असून, तिघांचीही प्रकृती अत्यवस्थ आहे. अपघाताचे वृत्त समजताच पोलादपूर पोलीस ठाणे, कशेडी टॅप वाहतूक पोलीस तसेच महाड वाहतूक पोलिसांनी घटनास्थळी तातडीने धाव घेऊन स्थानिक नागरिक तसेच स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने मृतदेह आणि जखमींना तातडीने पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये दाखल केले. यानंतर मृतदेह मृतांच्या मूळ गावी पाठविण्यात आले, तर जखमींना मुंबई येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले असल्याची माहिती पोलीस निरीक्षक अनिल जाधव यांनी दिली. दरम्यान, कंटेनरचालक अपघातस्थळावरून पसार झाल्याची माहिती प्राप्त झाली.

## ...आदिवासी बांधव वंचित

त्या ३९ कुटुंबांना प्रत्यक्ष लाभ मिळण्यास किमान बारा वर्षे लागणार आहेत. त्यावेळी लाभार्थी संख्या दरवर्षी वाढत जाणार असल्याने खरोखर गरीब असलेल्या आणि पक्क्या घरापासून वंचित असलेल्या लाभार्थ्यांना घरकुलं मिळतील काय, असा प्रश्न निर्माण झाला आहे. मात्र, दुसरीकडे ग्रामपंचायतीमध्ये तीन गावे असताना केवळ एकाच गावातील तिन्ही घरकुले पंचायत समिती कडून मंजूर करून घेण्यात आली आहेत. परंतु, ग्रामपंचायत कुडामेडीचे घरात राहणाऱ्या आदिवासी कातकरी कुटुंबांसाठी काहीही करीत नसल्याने ग्रामपंचायत सदस्य विजय हजारे यांनी जबाबदारी घेण्याचा निर्णय घेतला आहे. या कातकरी वाडीमधील अनंता गोपाळ वाघे आणि गोपी रमेश भोसले या दोन लाभार्थींची घरे दुरुस्त करून देण्यासाठी विजय हजारे यांनी आर्थिक मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या पुढाकाराची दखल घेऊन तेजस्वी सामाजिक संस्था यांच्याकडून अर्थसहाय्य करण्याचा निर्णय या संस्थेने घेतला आहे. त्या कुडामेडीच्या घराची दुरुस्ती करण्यासाठी तेजस्वी संस्था ६० हजारांची मदत करणार आहे. तर, विजय हजारे हे ६०-७० हजार खर्च करून नवीन घर बांधून देणार आहेत. त्या घरबांधणी कामासाठी वाघे कुटुंब श्रमदान करणार आहेत.

## ... तरुणाने केली चोरी

रवि गर्जे, पोलीस हवालदार कल्पेश नलावडे यांचे पथक तयार करण्यात आले. ही चोरी घरातील कोणीतरी केल्याचा संशय पोलिसांना होता. चौकशी करीत असताना प्रतिकच्या बोलण्यामध्ये असमानता दिसून आली. अखेर पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. पोलिसी दणका मिळाल्यावर तो बोलता झाला. वडखळ येथील जेएसडब्ल्यू कंपनीत सुपरवायझर म्हणून काम करीत आहे. त्याने बँकेकडून व्याजाने पैसे काढले होते. पैसे परत करण्यास तो अपयशी ठरल्याने त्याने अन्य व्यक्तींकडून व्याजाने पैसे घेतले. कर्ज घेऊनदेखील त्याची परतफेड करणे कठीण होऊन बसले होते. अखेर त्याने स्वतःच्या घरातील लोखंडी कपाट फोडून चार लाख ५६ हजार ३५८ रुपयांचे दागिने आणि काकांच्या घरातील पाच लाख १३ हजार ४४० रुपयांचे दागिने असा एकूण नऊ लाख १२ हजार ७१६ रुपयांचा ऐवज लंपास केल्याचे कबूल केले.

# मतदारांनो, मनातील मशाल पेटवा

## आदित्य ठाकरे यांचे आवाहन ◂◂ संजोग वाघेरे पाटील यांच्या सभांना प्रतिसाद

। नेरळ। प्रतिनिधी ।

जनतेने आपल्या मनातील मशाल पेटवून देशावर घोंघवणारे वादळ आणि अंधकार दूर करण्यासाठी निर्धार करा, तरुणांचे रोजगार हिरवणारे सरकार यांना पुन्हा सत्तेवरून खाली खेचा असे आवाहन देखील ठाकरे यांनी यावेळी केले.

मावळ लोकसभा मतदारसंघाचे महाविकास उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ कर्जत येथे आयोजित सभेत बोलत होते.

शिवसेना नेते आणि युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांनी यावेळी बोलताना किती विषयावर बोलायचे हा प्रश्न माझ्यासमोर आहे. मात्र जनतेने देशात परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत.देशातील रिपोर्ट येऊ लागले कोणत्याही परिस्थितीत भाजप २०० पार करणार नाही. देशात अंधकार पसरला आहे,राजकीय गोंधळ दूर करण्यासाठी आपल्या मनातील मशाल पेटण्याची गरज आहे.ती मशाल ई व्हीएम मशीनमध्ये पेटण्याची गरज आहे.





भाजप उत्तर प्रदेशमध्ये देखील ५०चे पुढे जाणार नाही असे ठामपणे सांगून ४००पार तर सोडा त्यांना दक्षिणेत एकाही राज्यात सत्ता येणार नाही असे सोर्स मिळत आहेत.उत्तरेत देखील अनेक राज्यात भाजपची लाट ओसरली आहे. हे दिसून येईल, असा विश्वास तेथे इंडिया आघाडीचे नेते लढत आहेत आणि त्यामुळे भाजप यावेळी कोणत्याही स्थितीत सत्तेत येणार नाही.आज काश्मीरमध्ये भाजपला उमेदवार मिळत नाहीत आणि त्यामुळे त्यांनी काश्मीर साठी हे केले ते केले सांगत असून ते मतदारांची फसवणूक करायची आहे.आता भाजप नेत्यांना विचारा तुम्ही ४०० पार कसे करणार,ते देशातील कोणत्याही राज्यात ठामपणे सांगू शकत नाही.भाजप प्रणित खोके सरकार राज्यात जनतेसाठी काय केलं हे त्यांना विचारायला हवे अशी सूचना आदित्य ठाकरे यांनी केली.

असली सेना हीच आणि जे आपल्याला नकली सेना म्हणत आहेत. त्यांना आपण २५वर्षे कमरेवर घेतले याची आठवण करून देत भाजपने आपल्याला जनतेला सातत्याने फसवले आहे.२०१४ आणि २०१९ मध्ये जनतेच्या खात्यात काय आले, भाजपची ही यशोगाथा मतदारांनी सर्व जनतेच्या मनात बिंबवले पाहिजे अशी सूचना इंडिया आघाडीचे कार्यकर्त्यांना आदित्य ठाकरे यांनी केली.

आज परिस्थिती अशी आली आहे ती म्हणजे भाजपने दहा वर्षात काय केले हे सांगण्याची हिंमत नाही आणि त्यामुळे काय खायचे काय खाऊ नये कोणते कपडे घालायचे कोणते कपडे घालायचे नाहीत असा प्रचार भाजप करीत आहे.भाजप सध्या महामानवांनी लिहिलेलं संविधान बदलण्याच्या तयारीत आहे. त्यांना ४०० जागा संविधान बदलण्यासाठी सत्ता पाहिजे आहे, असं मत आदित्य ठाकरे यांनी मांडले. या जाहीर सभेला शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते सचिन आहिर, मुंबईचे माजी महापौर किशोरी पेडणेकर, शिवसेना ठाकरे गटाने जिल्हा संपर्क प्रमुख बबन पाटील, राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीरंग बर्गे, शेकाप जिल्हा चिटणीस ॲड. आस्वाद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे जिल्हा अध्यक्ष सुरेश टोकरे, शिवसेना ठाकरे गटाचे उपजिल्हाप्रमुख नितीन सावंत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे प्रदेश सदस्य ॲड. गोपाळ शेळके, आम आदमी पक्षाचे जिल्हा अध्यक्ष यांच्यासह शिवसेना तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, एकनाथ पिंगळे, शेकाप तालुका चिटणीस श्रीराम राणे, राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष शंकर भुसारी, काँग्रेस तालुका अध्यक्ष संजय गवळी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या जाहीर सभेत ॲड. शेखर जांभळे यांनी आम आदमी पार्टीकडून तर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे माजी तालुका अध्यक्ष अरविंद पाटील, दीनानाथ देशमुख, कम्युनिस्ट पक्षाकडून गोपाळ शेळके यांची तर समयोचीत भाषणे झाली.

# शिंदे शिवसेनेला मोठा धक्का

। नेरळ । प्रतिनिधी ।

मावळ लोकसभेचा प्रचार अंतिम टप्प्यात असून मावळ मध्ये शिवसेनेच्या दोन गटामध्ये जोरदार चुरस निर्माण झाली आहे.मात्र प्रचाराच्या ऐन रणधुमाळीत शिवसेनेच्या महिला आघाडी जिल्हा संघटीका रेखा ठाकरे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.दरम्यान, रायगड जिल्ह्यात महिला आघाडी वाढविण्यात आणि पक्ष संघटना बळकट करण्यात मोठा वाटा असल्याने रेखा ठाकरे यांच्या प्रवेशाने शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे.



राज्यात शिवसेना भाजप युतीचे सरकार असताना आणि झुणका भाकर केंद्र युती काळात सुरू करून शिवसेनेच्या प्रवाहात रेखा ठाकरे सक्रिय झाल्या. साडे तीन वर्षे मुख्यमंत्री असताना तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी त्यावेळी कर्जत झुणका भाकर केंद्राचे कौतुक केले होते. नंतर कर्जत तालुक्यात कार्यरत असलेल्या रेखा ठाकरे यांच्याकडे शिवसेना महिला आघाडीची रायगड जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली.त्यानंतर महिला संघटन मजबूत करण्यात आणि रायगड जिल्ह्यात संघटन पाहून शिस्वेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि नंतर शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी देखील रायगडच्या शिवसेना महिला आघाडीचे जिल्हा संघटिका रेखा ठाकरे यांचे कौतुक केले होते. राज्यातील मजबूत असे संघटन म्हणून रायगड जिल्ह्याचे नाव होते आणि त्यात स्वतः आघाडीवर राहून जिल्हाभर पक्ष संघटना मजबूत करण्याचे कार्य रेखा ठाकरे यांच्याकडून झाले होते.राज्यात शिवसेना फुटीनंतर रेखा ठाकरे या शिवसेना शिंदे गटात राहिल्या होत्या.मात्र कर्जत चार फाटा येथील दुकाने वाचविण्यासाठी आमदारांनी सहकार्य केले नसल्याने रेखा ठाकरे या पक्षावर नाराज होत्या.पण राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कर्जत येथे विकासकामांचे लोकार्पण सोहळ्यात महिला आघाडी जिल्हा संघटक रेखा ठाकरे व्यासपीठावर उपस्थित होत्या.

शिवसेनेवर नाराज असलेल्या रेखा ठाकरे यांनी ९ मे रोजी युवासेना प्रमुख आणि शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांच्या उपस्थितीत उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला.रेखा ठाकरे यांचा रायगड जिल्ह्यातील महिला कार्यकर्त्यांशी असलेला संपर्क यामुळे त्यांच्या ठाकरे गटाच्या प्रवेशाने काही राजकीय फायदा मावळ लोकसभेचे उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांना होण्याची शक्यता आहे.

# कोंढरीपाडा ग्रामस्थांचा लोकसभा, विधानसभा निवडणुकांवर बहिष्कार

। उरण । वार्ताहर ।

मावळ लोकसभा मतदार संघाची निवडणूक १३ मे रोजी आहे. यात पुणे जिल्हा व रायगड जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश आहे.निवडणुकीची तारीख जवळ आल्याने दिवसेंदिवस राजकीय वातावरण अधिकच तापू लागले आहे. त्यातच मावळ लोकसभा मतदार संघातील उरण तालुक्यातील चाणजे ग्रामपंचायत हद्दीतील कोंढरीपाडा येथील ग्रामस्थांनी आपल्या आराध्य ग्रामदैवत श्री हनुमंताच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकाला त्याने केलेल्या गैरकृत्याबद्धल एक वर्ष पूर्ण झाले आहे तरी शासन होत नसल्याने लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे.

गेल्या एक वर्षापासून आगरी कोंढरी ग्रामस्थ हे गावातील ग्रामदैवत श्री हनुमंताच्या मूर्तीची विटंबना करणाऱ्या समाजकंटकाला त्याने केलेल्या गैरकृत्याबद्धल त्याला शासन व्हावे यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. परंतु काही शासकीय आणि राजकीय हस्तक्षेपामुळे गुन्हेगार हा गावात मोकाट फिरत आहे. आगरी कोंढरी पाड्यात असणाऱ्या श्री हनुमंताच्या मूर्तीची विटंबना ६ मे रोजी गावात राहणाऱ्या सम ाजकंटकाने केली होती. या इसम ावर उरण येथील पोलीस ठाण्यात तक्रारदेखील नोंदविण्यात आलेली आहे. गावकऱ्यांना कायद्यावर व शासकीय पोलीस यंत्रणेवर विश्वास होता की ग्रामदेवतेच्या झालेल्या विटंबनेला शासनातर्फे अथवा न्यायालयामार्फत योग्य ती फौजदारी कारवाई होईल अशी आशा होती. पोकळ आश्वासनाद्वारे आणि राजकीय हस्तक्षेपामुळे कोणतीही कारवाई न होता दिरंगाई होत असल्याने ग्रामस्थांनी येणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

# मावळ लोकसभा निवडणुकीत दिबांच्या नावाने मतांचा जोगवा

। उरण । वार्ताहर ।

लोकसभा निवडणुकीत मावळ लोकसभा मतदारसंघातील बहुसंख्य असलेल्या आगरी मतांसाठी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची घोषणा देत महायुती आणि महाविकास आघाडीच्या उमेदवारांकडून जोगवा मागितला जात आहे. सोमवारी खारघर येथील प्रचारसभेत राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या मागणीसंदर्भात दिबांच्या नावाची घोषणा करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे पुन: एकदा विमानतळाला दिबांचे नाव देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.







महायुतीच्या सरकारने महाविकास आघाडी सरकारचा ठरवा रद्द करीत वर्षभरापूर्वी दिबांचे नाव नवी मुंबई आंतराष्ट्रीय विमानतळाला नाव देण्याचा ठराव घेऊन केंद्रीय विमान उड्डान मंत्री यांच्याकडे पाठविला आहे. त्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत ठराव पारित करण्यात आला आला.

मात्र हा ठराव केंद्राकडे मंजुरीसाठी पडून आहे. या ठरावाला लवकरात लवकर मंजुरी मिळावी अन्यथा नामकरण समितीच्या वतीने आंदोलन केले जाईल असा इशारा समितीने दिला आहे. तर दिबांच्या चिरंजीवांनी भाजपच्या प्रचार मेळाव्यात भाजपा नाव देईल असा विश्वास व्यक्त केला होता. त्यामुळे अनेकांनी नाराजी व्यक्त केली होती.

### आंदोलन करूनही केंद्राचे दुर्लक्ष

**१२ जानेवारीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अटलसेतू, नेरुळ–उरण लोकल, नवी मुंबई मेट्रोचे उद्घाटन करण्यात आले. हा कार्यक्रम विमानतळाच्या जागेत झाला. मात्र त्यावेळी पंतप्रधानांनी दिबांचा साधा उल्लेखही न केल्याने आगरी समाजाने नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर दोन दिवसांनी स्वत: केंद्रीय उड्डयन मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी पत्रकार परिषद घेत नामकरणाचा निर्णय हे पंतप्रधान घेणार असल्याचे जाहीर केले होते. त्यामुळे नामकरणासंदर्भात आगरी समाजाकडून शंका व्यक्त केली जात आहे. याचे मुख्य कारण म्हणजे अटलसेतू पूर्ण होण्यापूर्वी त्याच्या नावाला मंजुरी मिळाली मात्र नामकरणासाठी दोन वर्षे आंदोलन करूनही केंद्र सरकारने साधी घोषणाही केलेली नाही.**

# ४ हजार मतदारांपैकी ५२ मतदारांनी घरुन मतदानाचा बजावला हक्क

। पनवेल । वार्ताहर ।

अपंग आणि वयोवृद्ध अशा व्यक्तींच्या घरापर्यंत मतपेटी घेऊन जाऊन निवडणूक आयोगाचे पथक मतदान करुन घेतात. याच योजनेतून मावळ लोकसभा मतदारसंघातील पनवेल विधानसभा क्षेत्रामधील ५२ व्यक्तींनी त्यांच्या घरुन मतदानाचा हक्क बजावला.

मावळ मतदारसंघात ८५ वर्षे वयाच्या पुढील २३ हजार ७३८ मतदार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघात दिव्यांग असे चार हजारांहून मतदार आहेत. अशा विशेष व्यक्तींसाठी निवडणूक आयोगाने शंभर टक्के मतदान होण्यासाठी त्यांच्या घरापर्यंत मतपेटीत थेट मतदान करता येईल असे नियोजन केले आहे. पनवेल विधानसभा क्षेत्रातील ४ हजारांपैकी प्रत्यक्षात ५२ मतदारांनी त्यांचा हक्क बजावला आहे. ही योजना ऐच्छिक असल्याने निवडणूक आयोगाच्या कार्यालयाशी संपर्क साधल्यानंतर पनवेलचे सहाय्यक निवडणूक निर्णय राहुल मुंडके यांनी एप्रिल महिन्यात निवडणूक आयोगाचे पथक संबंधित मतदारांच्या घरी पाठविले. अशा मतदारांना १२ डी नमुण्याचे अर्ज भरुन घेण्यात आले. निवडणूक आयोगाच्या आवाहनानंतर पनवेलमधील अधिक वय असणाऱ्या ४१ मतदारांचे आणि १६ अपंग मतदारांचे घरुनच मतदान करता यावे यासाठी निवडणूक आयोगाच्या पथकाला अर्ज भरुन दिले होते. संबंधित अर्जानुसार या योजनेतील मतदारांच्या घरी जाऊन पथकाने संबंधित मतदारांपर्यंत मतपेटी पोहोचवल्यामुळे त्यांना मतदान करता आले. ४० वयोवृद्ध आणि १२ अपंग मतदारांनी त्यांचे मतदान केल्याची माहिती राहुल मुंडके यांनी दिली.

# बोटीसह ५२५ वाहने आणि १२ हजार कर्मचारी सज्ज

। पनवेल । वार्ताहर ।

येत्या सोमवारी १३ मे रोजी मावळ लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक पार पडणार असून निवडणूक प्रशासनाची तयारी पुर्णत्वाकडे गेली आहे. सुमारे १२ हजार मतदार अधिकारी, कर्मचारी तसेच मतदान यंत्रांच्या वाहतुकीकरिता एका बोटीसह १७५ पीएमपीएमल बसेस, २१९ एसटी महामंडळाच्या बसेस, १०५ मिनी बसेस, २५ ईव्हीएम कंटेनर लागणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये २५ लाख ८५ हजार १८ मतदार असून यामध्ये १३ लाख ४९ हजार १८४ पुरुष मतदार, १२ लाख ३५ हजार ६६१ महिला मतदार आणि १७३ तृतीयपंथी मतदार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघामध्ये एकूण एकूण २ हजार ५६६ मतदान केंद्रे स्थापित करण्यात येणार आहेत. या मतदारसंघात ३३ उमेदवार निवडणुकीसाठी रिंगणात आहेत. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या ९ हजार २३६ बॅलेट युनिट, ३ हजार ५९१ कंट्रोल युनिट आणि ३ हजार ८१६ व्हीव्हीपॅट यंत्रांची सरमिसळ संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आले आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी आवश्यक असणाऱ्या एकूण २ हजार ५६६ मतदान केंद्रावर एकूण ११ हजार ३६८ मतदान अधिकारी, कर्मचारी नियुक्त केले गेले आहेत. तसेच संवेदनशील मतदान केंद्रांवर ८३ सूक्ष्म निरीक्षक देखील नियुक्त करण्यात आले आहेत. मतदानासाठी १ हजार ९५८ बॅलेट युनिट, ७५० कंट्रोल युनिट आणि ७८८ व्हीव्हीपॅट यंत्रांची आवश्यकता असून या यंत्रांची सरमिसळ करून विधानसभा






निहाय त्यांचे वितरण देखील करण्यात आले आहे. सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर मतदान यंत्र तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू असून मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक प्रशिक्षण देखील वेळोवेळी दिले जात आहे.

पनवेल विधानसभा मतदारसंघामध्ये ५४४ मतदान केंद्रे असून याठिकाणी २ हजार ४०४ मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. कर्जत विधानसभा मतदारसंघामध्ये ३३९ मतदान केंद्रे असून याठिकाणी १ हजार ५०० मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. उरण विधानसभा मतदारसंघामध्ये ३४४ मतदान केंद्रे असून याठिकाणी १ हजार ५२० मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. म ावळ विधानसभा मतदारसंघामध्ये ३९० मतदान केंद्रे असून याठिकाणी १ हजार ७३२ मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. तसेच १ हजार ४०४ बॅलेट युनिट, ५५३ कंट्रोल युनिट आणि ५९२ व्हीव्हीपॅट आवश्यक आहेत. यासाठी ४५ वाहतूक झोन तयार करण्यात आले आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघामध्ये ५४९ मतदान केंद्रे असून याठिकाणी २ हजार ४३६ मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. पिंपरी विधानसभा मतदारसंघामध्ये ४०० मतदान केंद्रे असून याठिकाणी १ हजार ७७६ मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. अशी माहिती दीपक सिंगला यांनी दिली.

# मतदानासाठी अनोखी शक्कल

**पनवेल :** लोकसभा निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी आणि दुकानाची जाहिरात होण्यासाठी पनवेलमधील एका साडी विक्रेत्या व्यापाऱ्याने अनोखी शक्कल लढविली आहे. पनवेल विधानसभा क्षेत्रात मतदान होणार आहे. मतदान करुन पनवेल शहरताली छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याशेजारी दुकानात मतदान करुन थेट दुकानात येणाऱ्या पहिल्या ५१ स्त्रियांसाठी ही योजना दुकानदाराने जाहीर केली आहे. महिला मतदारांसह १३ मे रोजी मतदान करुन येणाऱ्या पहिल्या ५१ पुरुष मतदारांसाठी या दुकानदाराने सियाराम कंपनीचे शर्ट व पॅन्टपीस देणार असल्याची जाहीर केले आहे. शहरातील द्वारकादास शामकुमार या दुकानाचे चालक शरद पाटील यांनी ही जाहीरात समाजमाध्यमांवर ही जाहिरात केली आहे.



With Best Compliments From
Maheshwari Fuel Chem Private Ltd.
06, TILAK BUNGLOW, ISAMBA PHATA, VILLAGE NIPHAN, KHALAPUR, KHOPOLI, 410203, RAIGAD, MAHARASHTRA.

# सूत्रधार मोकाटच

डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या हत्या प्रकरणात दहा वर्षांनंतर का होईना दोन आरोपी दोषी ठरून त्यांना शिक्षा झाली हे ठीक झाले. मात्र, पाचपैकी तिघांची निर्दोष सुटका आणि मुख्य सूत्रधार कोण याचाही पत्ता नाही हेही या खटल्याचे फलित आहे हेदेखील ध्यानात ठेवायला हवे. दाभोळकर हे क्रियाशील विचारवंत होते. त्यांच्या हत्येचा तपास असा व्हावा आणि मूळ गुन्हेगारापर्यंत जाता येऊ नये हा स्वतःला पुरोगामी म्हणवणाऱ्या महाराष्ट्रावरचा एक डागच म्हणायला हवा. अर्थात, विद्यमान सरकार चालवणारांना तसे वाटते का हा खरा प्रश्न आहे. किंबहुना, दाभोळकरांची हत्या घडवून आणण्याचा ज्यांच्यावर आरोप होता त्यांच्या विचार परिवाराबद्दल या सरकारला सहानुभूती वाटते हे लपून राहिलेले नाही. त्यामुळे या खटल्यावर भविष्यातही सातत्याने लक्ष ठेवून राहावे लागणार आहे. वीस ऑगस्ट २०१३ ला दाभोळकरांची पुण्यात हत्या झाल्याच्या पहिल्या दिवसाच्या पहिल्या तासापासून तपास यंत्रणांनी अक्षम्य ढिलाई दाखवली. हत्या झाली ते ठिकाण पोलिस चौकीपासून दोन मिनिटांवर आहे. पण तरीही पोलिस खूप उशिराने पोचले. नंतर तात्काळ जी कडेकोट नाकेबंदी व्हायला हवी होती ती झाली नाही. त्याचाच परिणाम म्हणून हल्लेखोरांनी वापरलेले पिस्तुल व मोटारसायकल यांचा तपास शेवटपर्यंत लागला नाही. आजच्या काळात हा एक अतर्क्य असा प्रकार म्हणायला हवा. मुंबईसारख्या दीड कोटींच्या शहरांमध्ये असेच गुन्हे करणाऱ्यांचा तपास तेथील पोलिस ज्या कौशल्याने व चपळतेने करतात ती या संपूर्ण तपासात दिसली नाही. त्यामुळे पुढे हा तपास सीबीआयकडे देण्यात आला. त्यांनी पहिली चार वर्षे गोवा बॉंबस्फोटातील आरोपी सारंग अकोलकर व विनय पवार यांना आरोपी गृहित धरून तपास केला. कहर म्हणजे २०१८ ला तपासाची ही दिशा एकदम बदलली आणि आता जे दोषी ठरले आहेत ते शरद कळसकर व सचिन अंदुरे ते दोघे खरे हल्लेखोर व मारेकरी असल्याचे सीबीआयला कळले.

### खटले फास्ट ट्रॅक हवेत

यातही सीबीआयचे कर्तृत्व शून्य आहे. २०१७ मध्ये कन्नड पत्रकार गौरी लंकेश यांची बंगलोरमध्ये हत्या झाली. लंकेश यादेखील समाजवादी विचारांच्या बंडखोर पत्रकार होत्या. त्यांच्या हत्येच्या तपासासाठी तत्कालीन काँग्रेस सरकारने जे एटीएस पथक स्थापन केले त्याने उत्तम काम केले. त्याच्या अधिकाऱ्यांनी चिंचवडमध्ये येऊन अमोल काळे या मारेकऱ्याला अटक केली. त्याच्या जबाबावरून हे स्पष्ट झाले की, कळसकर हा दाभोळकरांचा खरा मारेकरी आहे. काळे याच्या जबाबावरूनच नालासोपारा येथील वैभव राऊत याच्या घरात मोठा शस्त्रसाठा जप्त झाला व या सर्व मंडळींविरुध्द ठोस पुरावे मिळाले. मात्र सीबीआयने या पुराव्यांचा पुरेसा उपयोग केला असे म्हणता येत नाही. त्यांनी त्या शस्त्रसाठ्याच्या मागच्या दहशतवादी विचारांपर्यंत जाणे गरजेचे होते. हे सर्व लोक स्वतःला सनातन किंवा तत्सम हिंदुत्ववादी गटांशी संबंधित होते. यांच्यापैकीच काही लोकांनी पूर्वी गोव्यात तसेच ठाण्यात गडकरी रंगायतनजवळ स्फोट केले होते. मात्र त्यानंतर त्यांची पाळेमुळे ज्या रीतीने खणून काढली जायला हवी होती ते झाले नाही. त्यामुळे आजतागायत हे लोक मोकाट आहेत. दाभोळकरांनंतर वर्षभरातच कम्युनिस्ट नेते गोविंद पानसरे व एम. एम. कलबुर्गी यांची हत्या झाली. या सर्व प्रकरणांमध्ये समान दुवे दिसले. पण या सर्वांचा तपास एका टप्प्यावर येऊन थांबला. त्यात ठोस प्रगती होऊ शकली नाही. त्यामुळेच हे इतर खटले अजून उभेदेखील राहिलेले नाहीत. वास्तविक या सर्व गुन्ह्यांचा एकत्रित तपास होऊन फास्ट ट्रॅक कोर्टामार्फत खटले निकालात निघायला हवे होते. आज दाभोळकर प्रकरणात दोन आरोपींना शिक्षा झाली असली तरी हे प्रकरण अपिलात जाणार व तेथेही ते बरेच रेंगाळत ठेवण्याचे प्रयत्न होणार हे स्पष्ट आहे. ते वेगाने होण्यासाठी देशातील आणि राज्यातील हिंदुत्ववादी सरकारे काही प्रयत्न करतील ही शक्यता शून्य आहे.

### अपिलात काय होणार?

डॉ. दाभोळकर हे सर्व धर्मांमधील अंधश्रध्दांच्या विरोधात बोलत होते. डॉक्टरांमुळे हिंदू धर्मातील पूजाअर्चा, धार्मिक विधी इत्यादींची थोतांडे उघडकीस आली. भटभिक्षुक किंवा भगत मंडळींच्या फायद्यासाठी ही कर्मकांडे रचली गेली आहेत हे स्पष्ट झाले. खरा धर्म काय असतो हे ते समजावून सांगू लागले. हिंदुत्ववाद्यांना मुसलमानांविरुध्द आग पेटवण्यासाठी फक्त हिंदू या लेबलचा वापर करून घ्यायचा असतो. डॉक्टरांच्या प्रचारामुळे त्यांचे हे कारस्थान उघड होऊ लागले. त्यामुळेच सनातन संस्थेचे लोक व त्यांची मुखपत्रे दाभोळकरांना पूर्वापार इशारे देत होती. मारण्याच्या धमक्या देत होती. त्यामुळे या खुनामागे तेच आहेत असाच वहीम होता व तपासात त्याचे थोडेफार पुरावेही समोर आले. पण ते निर्णायक ठरतील अशा रीतीने तपास झाला नाही किंवा कदाचित होऊ दिला गेला नाही. त्यामुळे या खुनामागे असलेला विघातक विचार व त्याचे सूत्रधार अजूनही पडद्याआड राहिले आहेत. हिंदुत्ववादी गटांनी मधल्या काळात या ढिलाईचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. परकीय देणगी संस्थांशी असलेल्या संबंधांमधूनच दाभोळकरांची हत्या झाली असावी असे फाटे फोडण्याचे प्रयत्न त्यांनी केले. आता वीरेंद्र तावडे व इतर दोघांची निर्दोष मुक्तता झाल्याचा फायदा घेऊन पुन्हा एकवार हे लोक हा कांगावा सुरू करणार आहेत. या खटल्याचा निकाल ऐन निवडणुकीत, तोही पुण्यातील मतदानाच्या दोन दिवस आधी यावा हादेखील योगायोग मानायचा का हा प्रश्नच आहे. तो नाही असे मानले तरीही आता या खटल्याच्या निकालाचा फायदा घेऊन हिंदुत्ववाद्यांवर अन्याय झाला, तावडे इत्यादींना विनाकारण तुरुंगात राहावे लागले असा आक्रोश सुरू होणार आहे. सीबीआयने साधे फोनचे रेकॉर्ड्सही तपासात समोर आणलेले नाही. किंवा अनेक साक्षीपुरावे समोरच आणलेले नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. उद्या अपिलात सरकारची बाजू तकलादू निघाली तर दोघे जण निर्दोष ठरल्याचे हे आजचे समाधानही टिकणार नाही.

विचार

# महाग आरोग्यविमा आणि बरंच काही...

**अर्थविश्वात सरत्या आठवड्यात लक्षवेधी बातम्यांची रेलचेल होती. यापैकी सामान्यांच्या दृष्टीने महत्वाची बातमी म्हणजे आरोग्य विम्याचा हप्ता महागणार आहे. याखेरीज विमानप्रवासात जादा सामान नेल्यास खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे. दरम्यान, देशातून होणाऱ्या बासमती तांदळाच्या निर्यातीचा विक्रम झाला असून रशियाकडून कच्च्या तेलाच्या आयातीत वाढ नोंदवण्यात आली आहे.**




महेश देशपांडे

सामान्यांच्या दृष्टीने सरत्या आठवड्यातील महत्वाची बातमी म्हणजे आरोग्य विम्याचा हप्ता महागणार आहे. याखेरीज विमानप्रवासात जादा सामान नेल्यास खिशावर अतिरिक्त भार पडणार असल्याचीही वार्ता आहे. दरम्यान, बासमती तांदळाच्या निर्यातीचा विक्रम झाला असून रशियाकडून कच्च्या तेलाच्या आयातीत वाढ नोंदवण्यात आली आहे.

विमा नियामक प्राधिकरण (इर्डा) ने नुकतेच आरोग्य विम्याच्या नियमांमध्ये काही बदल केले आहेत. यानंतर विमा क्षेत्रात काही बदल होऊ शकतात. त्याचा परिणाम भविष्यात विम्याच्या हप्त्यावर दिसू शकतो. नवीन नियमानुसार आता काही आजारांसाठी विमा दावा घेण्यासाठी जास्तीत जास्त तीन वर्षे वाट पहावी लागणार आहे. पूर्वी ही मुदत चार वर्षे होती. 'इर्डा'ने केलेल्या बदलांनंतर विमा कंपन्या वेगवेगळ्या पॉलिसींच्या प्रीमियममध्ये बदल करण्याच्या विचारात आहेत. 'आयसीआयसीआय प्रुडेंशियल स्मार्टलाइफ'सह 'स्मार्टकिड' पॉलिसीच्या प्रीमियममध्ये ७.५ टक्क्यांवरून साडेबारा टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात आली आहे. 'एचडीएफसी अर्गो'ने कंपनीला सरासरी प्रीमियम ७.५ टक्के ते १२.५ टक्के वाढवावा लागेल, असे म्हटले आहे. विमा कंपन्याही याबाबतची माहिती ई-मेलद्वारे ग्राहकांना देत आहेत. विमा कंपन्यांनी दिलेल्या माहितीमध्ये सांगण्यात आले आहे,की तुम्हाला चांगली योजना देण्यासाठी प्रीमियम दर (विम्याच्या किमती) किंचित वाढवावे लागतील. विमा योजनेच्या कामगिरीचा आढावा घेण्यासोबतच कंपन्यांनी उपचारखर्चात झालेली वाढही विचारात घेतली आहे.

'एचडीएफसी अर्गो' म्हणते की प्रीमियम वाढ थोडी त्रासदायक असू शकते; परंतु आवश्यक असेल, तेव्हाच ती केली जाते. 'इर्डा'ला माहिती देऊनच विमा हप्त्यात वाढ केली जाते. दरांमधील हा बदल नूतनीकरण प्रीमियमवर परिणाम करू शकतो. नूतनीकरणाची तारीख जवळ येईल तसतशी पॉलिसीधारकांना याबद्दल माहिती दिली जाईल. 'एको जनरल इन्शुरन्स कंपनी'चे उपाध्यक्ष रुपिंदरजीत सिंग म्हणाले की काही विमा कंपन्या प्रीमियम दहा ते १५ टक्के वाढवू शकतात. 'इर्डा'ने ने नुकत्याच केलेल्या बदलांमध्ये, आरोग्य विमा घेण्यासाठी वयोमर्यादा न ठेवण्याचाही प्रस्ताव आहे. यापूर्वी ही मर्यादा ६५ वर्षांची होती. ते म्हणाले की वाढत्या वयाबरोबर व्याधींचा धोका वाढतो. त्यामुळे वयानुसार प्रीमियमची रक्कमही वाढवता येते. प्रीमियम सरासरी दहा ते वीस टक्के वाढू शकतात. कारण विमा कंपन्यांना आपल्या वाढत्या खर्चाची काळजी घ्यावी लागते. भारतातील वैद्यकीय महागाईचा दर वार्षिक १५ टक्के इतका आहे. प्रीमियम वाढण्याचे ते एक कारण आहे. ऑनलाइन इन्शुरन्स ब्रोकरच्या माहितीनुसार गेल्या काही वर्षांमध्ये देशात आरोग्य विमा घेणाऱ्या लोकांकडून भरलेल्या सरासरी रकमेत लक्षणीय वाढ झाली आहे. एका अहवालानुसार, २०१९ ते २०२४ या सहा काळात सरासरी रक्कम ४८ टक्क्यांनी वाढून २६,५३३ रुपये झाली आहे. या वाढीमागे दोन कारणे दिली जात आहेत. पहिले, उपचारांच्या खर्चात झपाट्याने झालेली वाढ (वैद्यकीय महागाई) आणि दुसरे म्हणजे कोविड-१९ साथीच्या आजारानंतर आरोग्य विम्याबद्दल लोकांमध्ये जागरूकता वाढली आहे. आता आणखी काही लक्षवेधधी बातम्या. अन्नधान्याच्या बाबतीत भारत आघाडीवर आहे. देशात गव्हासह तांदळाचेही मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. देशातून मोठ्या प्रमाणात निर्यातदेखील केली जाते. दरम्यान, बासमती तांदळाच्या निर्यातीमध्ये भारत आघाडीवर आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने मोठ्या प्रमाणात बासमती तांदळाची निर्यात केली आहे. वर्षभरात निर्यातीतून भारताने ४८ हजार ३८९.२ कोटी रुपये कमावले आहेत. पाकिस्तानच्या अडथळ्यानंतरही भारतातर्फे मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात केली जात आहे. सौदी अरेबिया हा भारतीय बासमती तांदळाचा सर्वात मोठा आयातदार देश आहे. त्याला भारताने १०.९८ लाख टन बासमती तांदूळ विकून १० हजार ३९१ कोटी रुपये कमावले. एप्रिल २०२३ ते मार्च २०२४ दरम्यान भारताने जगातील शंभरहून अधिक देशांमध्ये ५२ लाख ४२ हजार ५११ टन बासमती तांदूळ निर्यात केला. एवढा बासमती तांदूळ कधीच निर्यात झाला नव्हता. प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात तांदळाची निर्यात झाली आहे. २०२३-२४ मध्ये भारताने बासमती तांदळाची मोठ्या प्रमाणात निर्यात केली असून सरासरी १११३ डॉलर प्रति टन या दराने निर्यात केली आहे. २०२२-२३ मध्ये सरासरी १०५० डॉलर प्रति टन या दराने बासमतीची निर्यात केली गेली. मागील वर्षाच्या मानाने या वर्षी तांदळाची मोठ्या प्रमाणात आणि चांगल्या दराने निर्यात केली आहे. भारताने उरुग्वे या देशाला सर्वात जास्त दराने तांदळाची निर्यात कली आहे. १९६६ युएस डॉलर प्रति टन या दराने तांदळाची विक्री केली आहे.

दरम्यान, टाटा समूहाच्या 'एअर इंडिया'ने प्रवाशांना धक्का दिला आहे. आता 'एअर इंडिया'ने सामान नेणे महाग होणार आहे. या एअरलाइनने मोफत सामानाची मर्यादा २० किलोवरून १५ किलोपर्यंत कमी केली आहे. 'एअर इंडिया'चे नियंत्रण सरकारकडून घेतल्यापासून टाटा समूह 'एअर इंडिया'ला फायद्यात आणण्यासाठी नवीन पावले उचलत आहे. सरकारच्या नियंत्रणाखाली 'एअर इंडिया'ला अंदाजे ५० हजार कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. विमान कंपनीने ट्रॅव्हल एजंटना पाठवलेल्या अधिसूचनेत या निर्णयांची माहिती दिली आहे. 'एअर इंडिया'ने म्हटले आहे की इकॉनॉमी कम्फर्ट आणि कम्फर्ट प्लस श्रेणींमध्ये प्रवास करणाऱ्या प्रवाशांना आता १५ किलोपर्यंतची एक हँडबॅग मोफत घेता येणार आहे. टाटा समूहाने २०२२ मध्ये 'एअर इंडिया' विकत घेतली. यापूर्वी 'एअरलाइन'ला 'चेक-इन बॅगेज' म्हणून २५ किलोपर्यंतची बॅग घेऊन जाण्याची परवानगी होती. गेल्या वर्षी ती २० किलोपर्यंत कमी करण्यात आली होती. आता 'डीजीसीए'ने कमाल १५ किलोची बॅग असा नियम केला. देशातील बहुतेक खासगी विमान कंपन्या केवळ १५ किलोपर्यंत मोफत 'चेक-इन बॅग'ची परवानगी देतात. आता हाच नियम 'एअर इंडिया'मध्येही लागू करण्यात आला आहे. 'इंडिगो'सारख्या बजेट एअरलाइन्स प्रवाशांना फक्त एक बॅग घेऊन जाण्याची परवानगी देतात; परंतु 'एअर इंडिया'मध्ये १५ किलोपर्यंत अनेक बॅगा घेऊन जाता येतात. विमान वाहतूक नियामक 'डीजीसीए'च्या नियमांनुसार, सर्व विमान कंपन्यांना प्रवाशांना किमान १५ किलोची बॅग बाळगण्याची परवानगी द्यावी लागते.

भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीत रशियाचा वाटा पुन्हा वाढला आहे. ताज्या आकडेवारीवरून दिसून आले आहे की, एप्रिल महिन्यात भारताच्या एकूण कच्च्या तेलाच्या आयातीपैकी ४० टक्के वाटा एकट्या रशियाचा होता. त्याआधी मार्च महिन्यात एकूण आयातीमध्ये रशियातून येणाऱ्या कच्च्या तेलाचा वाटा ३० टक्के होता. गेल्या काही दिवसांपासून कच्च्या तेलाच्या किमती वाढत असताना रशियाकडून भारताची कच्च्या तेलाची आयात वाढली आहे. वाढत्या भू-राजकीय तणावामुळे गेल्या महिन्यात कच्च्या तेलाच्या किमतीत लक्षणीय वाढ झाली होती, अशा परिस्थितीत भारतीय रिफायनर्सनी पैसे वाचवण्यासाठी पुन्हा रशियाच्या कच्च्या तेलाची खरेदी वाढवली. त्यामुळे एप्रिल महिन्यात एकूण आयातीत रशियाचा वाटा पुन्हा वाढला. 'व्होर्टेक्सा' या एनर्जी कार्गो ट्रॅकरच्या मते भारतीय रिफायनर्सनी एप्रिलमध्ये रशियाकडून दररोज १.७८ दशलक्ष पिंप कच्चे तेल आयात केले.

मार्च महिन्यात झालेल्या आयातीपेक्षा हे प्रमाण १९ टक्के अधिक आहे. गेल्या महिन्यात भारतीय रिफायनर्सदेखील रशियन कच्च्या तेलाचे सर्वात मोठे खरेदीदार बनले. भारतीय रिफायनर्सच्या १.७८ दशलक्ष पिंप प्रति दिन खरेदीच्या तुलनेत चीनची आयात प्रति दिन १.२७ दशलक्ष पिंप इतकी होती. चीन दुसऱ्या क्रमांकावर होता. युरोपने एप्रिल महिन्यात रशियाकडून दररोज ३९६ हजार पिंप कच्चे तेल खरेदी केले. एप्रिल महिन्यात, रशियाने पुन्हा एकदा भारताच्या बाबतीत स्त्रोत देशांमध्ये पहिले स्थान मिळवले. एप्रिल महिन्यात भारताने रशियाकडून सर्वाधिक कच्च्या तेलाची खरेदी केली. त्यानंतर इराक, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीसारखे देश आले. आकडेवारीतील सर्वात मनोरंजक बाब म्हणजे भारताच्या चार सर्वात मोठ्या पुरवठादारांमध्ये पहिल्या स्थानावर असलेल्या रशियाने इराक, सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिरातीच्या एकूण पुरवठ्यापेक्षा जास्त पुरवठा केला.

आजकाल

# पंकजांची कसोटी, जातीचा मुद्दाच प्रमुख

आरक्षण मागणी आंदोलनानंतर मराठा जातीचे ध्रुवीकरण त्यातून निर्माण होणारा रोष गेवराई, बीड आणि माजलगाव विधानसभा मतदारसंघात जोरावर आहे. त्याची प्रतिक्रिया म्हणून एकवटलेला ओबीसी मतदार दुसऱ्या बाजूला, असे निवडणुकीतील पारंपरिक जातीय प्रारुप या वेळी बीड लोकसभा मतदारसंघात पुन्हा रंगले आहे. त्यात पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांच्यामध्ये अटीतटीची लढत होईल असा अंदाज व्यक्त केला जात आहे. बीडची निवडणूक राष्ट्रीय मुद्दयांवर कमी आणि जात केंद्रीत अधिक अशीच होत आहे.

लोकसभेच्या रिंगणात मराठवाड्यातील सर्वाधिक ४१ उमेदवार बीडमध्ये. त्यातील १८ उमेदवार मुस्लिम. पाच उमेदवार मराठा, त्यामुळे मतांची वजाबाकी करण्याचा पद्धतशीर प्रयत्न दिसून येतो आहे. त्यात मतदान यंत्रामध्ये एक नवा संभ्रम आहे तो तुतारीवाला माणूस आणि तुतारी या चिन्हामध्ये या दोन चिन्हांचा क्रम ठरवताना फक्त बसपाचा हत्ती हे चिन्ह मध्ये आहे. निवडणुकीतील हे बारकावे एका बाजूला दिसत असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सभा अंबाजोगाईमध्ये होत आहे. जातीय समीकरणात एकवटण्याचा उच्च टोकावर मराठा आणि ओबीसी पोहचले असल्याने निवडणुकीनंतर उसवलेली सामाजिक वीण दुरुस्त करणे अवघड होऊन बसेल असे वातावरण गावोगावी निर्माण झाले आहे. मतदारसंघनिहाय आता बेरजा- वजाबाक्या सुरू झाल्या आहेत.

भाजपामधील अतर्गंत कुरबुरीतून नाराज असल्याचे संदेश वारंवार देणाऱ्या पंकजा मुंडे आणि त्यांचे समर्थक समाज पक्षाचे महादेव जानकर यांना भाजपने उमेदवारी दिली. रोष व्यक्त करणारे भाजपातील चेहरे कामाला लागले. राष्ट्रवादीमधील फुटीनंतर भाऊ धनंजय मुंडे बहिणी पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी बाहेर पडले. त्यामुळे परळीचे मतदार कोंडीतून बाहेर आले. आता या विधानसभा मतदारसंघात सारे काही कमळाभोवती असे वातावरण आहे. केज हा पट्टा बजरंग सोनवणे यांचा. या पट्ट्यात त्यांचा साखर कारखाना आहे. त्यामुळे उसाचे राजकारण या भागात प्रभावी ठरेल. तसेच जातीची तुतारीही त्यांनी जोरदारपणे फुंकली आहे. त्याचा परिणाम आंतरवली सराटीला जवळ असणाऱ्या गेवराई, माजलगाव या पट्टयात अधिक असू शकेल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. मराठा समाजाने बजरंग सोनवणे यांचे गावोगावी मोठे स्वागत केले आहे. जसाजसा मराठा समाजातील जोष वाढतो आहे तसतसे ओबीसी मतांचे ध्रुवीकरणही होत आहे.

बीड लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारांच्या नावे व त्यांची जात हा ज्याच्या त्याच्या तोंडी असणारा विषय. त्यामुळे पंकजा मुंडे यांच्याशिवाय माळी, धनगर किंवा इतर मागास वर्गीयांमधील अन्य प्रभावी उमेदवार रिंगणात नाही, हे आवर्जून सांगितले जात आहे. दुसरीकडे आता महायुतीचे नेते एकवटले आहेत. पण नेत्यांना रोषाला सामोरे जावे लागत आहे. अलीकडेच पंकजा मुंडे यांना माजलगाव तालुक्यातील लऊळ या गावी आरक्षण आंदोलक समर्थकांनी घेराव घातला होता. प्रतिस्पर्धी उमेदवार बजरंग सोनवणे यांचा कारखाना असणाऱ्या केज तालुक्यातील औरंगपूर गावातही पंकजा मुंडे यांच्यासमोर मराठा आंदोलकांनी घोषणाबाजी केली. तत्पूर्वी शिरूर तालुक्यातील खालापुरी गावात त्यांच्या गाड्यांचा ताफा अडवला होता. याशिवाय प्रकाश सोळंके, रमेश आडसकर यांनाही आंदोलक कार्यकर्त्यांनी प्रचार करताना थांबवले होते. महायुतीमधील नेते एकवटले असले तरी त्यांना रोषाचा सामना करावा लागत आहे. तर दुसऱ्या बाजूला मतांची गोळाबेरीज करणारे व्यवस्थापन करू शकणारी मंडळी महायुतीच्या बाजूने आहे. यामध्ये सुरेश धस, बाळासाहेब आसबे, अमरसिंह पंडीत, लक्ष्मण पवार, नमिता मुंदडा, रमेश आडसकर यांच्यासह धनंजय मुंडे ही मंडळी पंकजा मुंडे यांच्या बाजूने उभी आहे. तर बजरंग सोनवणे यांच्या बाजूने आमदार संदीप क्षीरसागर आणि नव्याने शिवसेना शिंदे गटाचा राजीनामा देऊन बाहेर पडलेले सुरेश नवले दिसत आहेत.

दिवगंत गोपीनाथ मुंडे यांचे नेतृत्व असणाऱ्या काळापासून बीड जिल्ह्याचे नेतृत्व ओबीसी नेत्यांच्या हाती आहे. त्यामुळे त्याविरोधात उभे ठाकणारा मराठा समाजही आता ताकदीने उतरला आहे. दुसरीकडे ओबीसी मतदारांमध्येही अस्वस्थता आहे ती नेतृत्वाला आव्हान असण्याची. गेल्या पाच वर्षात भाजप सत्तेत असताना पंकजा मुंडे यांना सत्तेतील कोणतेही पद देण्यात आले नव्हते. आता जर नेतृत्व उभे करायचे असेल तर ही निवडणूक ' प्रतिष्ठे'ची करण्याशिवाय पर्याय नसल्याचीही भावना 'ओबीसी' मध्ये दाटलेली आहे. आरक्षण केंद्रबिंदू मानून रचल्या गेलेल्या राजकीय पटावर कोण सरस ठरणार याची उत्तरे निकालानंतरच मिळतील पण राष्ट्रीय मुद्दे प्रभावहीन ठरतील, असेच चित्र बीडच्या प्रचारात दिसून येत आहेत.

लोकसंसद

## दक्षिण कोरियात इंग्रजी शिकविणाराची मोठी मागणी

पूर्व आफ्रिकेतील दक्षिण कोरिया हा एक धनाढ्य देश आहे. या देशाचे दरडोई उत्पन्न ३६१९० अमेरिकन डॉलर्स आहे. तर भारताचे उत्पन्न २३०० अमेरिकन डॉलर्स एवढे आहे. भारतातील पुरुषाचे सरासरी आयुर्मान ६६ वर्षे आहे. तर दक्षिण कोरियातील पुरुषाचे आयुर्मान ८७ वर्षे आहे. दक्षिण कोरियात बेरोजगारी २.८ एवढी आहे तर भारताची ७.६ एवढी आहे यावरून दक्षिण कोरियातील एकूण राहणीमान लक्षात येईल. सध्या तेथे इंग्रजी शिकविणारी मोठी मागणी आहे हे वृत्त नुकतेच वाचण्यात आले. सरकारला सुद्धा लोकांना इंग्रजी शिकलेले पाहिजे आहे. त्यामुळे जगभरातील अनेक देशातील लोक इंग्रजी शिकविण्यासाठी तेथे जात आहेत. इंग्रजी शिकविणारांचे वार्षिक उत्पन्न सुद्धा चांगले आहे एकूणच भारताला सुद्धा एक चांगली संधी आहे. अनेक इंग्रजी शिकविणारे तेथे जाऊन चांगली प्राप्ती करू शकतात. जगात आज जर्मनीत सुद्धा मोठी नोकऱ्यांची संधी आहे भारतीय तरुणांनी अश्या संधीचा फायदा घेणे जरुरीचे आहे.

**- शांताराम वाघ, पुणे**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**११ मे**

**१९५८ :** नागेश रा. जोशी यांचा जन्म १६ सप्टेंबर १९१ नट आणि नाट्यलेखक म्हणून मराठी साहित्यात व्यांच्या पंधराव्या वर्षी त्यांनी बालमोहन नाटक मंडळी वेश लग्नाची बेडी या नाटकातील अवधूतची भूमिका त्यांची पु मंडळीतून बाहेर पडल्यावर त्यांनी छोटा गंधर्व शंकर आपटे यांच्या कलाविलास ही नाट्यसंस्था काढली. या संस्थेसाठी त्यांनी भूमिकाही केल्या. देवमाणूस या त्यांनी लिहिलेल्या नाटकात है गंधर्वांनी दिलेल्या चाली आणि हंसराज कोरडे यांनी उभा केलेला कुटुंग सर्वस्वाचा त्याग करणारी दुदैवी दादा यामुळे हे नाटक गाजले. हे नाटक गाजले की, त्या काळात १० वर्षात त्यांच्या पुस्तकरुपात ९ आवृत प्रकाशित झाल्या. कौटुंबिक वातावरण, दोन मनांचे द्वंद, सुदुष्ट प्रवृत्ती संघर्ष त्याला कौटुंबिक पाश्वभुमी हे या नाट्याचे विशेष जोशी यांची संगीत फुलपाखरे, संगीत मैलाचा दगड, संगीथ विजय ही नाटकेही रंगभूमीवर आली. यातील संगीत विजय हे नाटक कामगारांचा संप मजुरांची एकजूट असा काहीसा त्या काळात वेगळा विषय असल्याने या नाटकाला प्रेक्षकांची दाद मिळाली. अंतरपाट हे नाटकही जोशींच्या नावावर आहे. त्या काळात हिब्सेचा प्रभाव मराठी रंगभूमीवर होता. तो जोशींच्या नाटकावरही जाणवतो. परंतु त्यांनी स्वगते आणि संगीत घालून लोकप्रियतेसाठी तडजोड केली, असे त्यांचे टीकाकार म्हणतात. तथापि मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात तिला आदर देण्याचे काम जोशींच्या नाट्यलेखनांनी केले. प्रेक्षकांना रुचेल असे कथानक, साधी सोपी भाषा, भावना प्रधान आणि संगीत यामुळे त्यांची नाटके यशस्वी ठरली. एकंदरीत मराठी रंगभूमीच्या पडत्या काळात तिला सावरु पाहणाऱ्यांच्या यावीत त्यांचा समावेश केला जातो. वयाच्या अवघ्या ४३ व्या वर्षी ११ मे १९५८ रोजी त्यांना आलेल्या अकाली निधनाने नाट्यसृष्टीची हानी झाली. **१८७८:-** न्या. महादेव गोविंद रानडे व 'लोकहितवादी' गोपाळराव हरी देशमुख यांच्या पुढाकाराने पहिले 'मराठी ग्रंथकार संमेलन' या दिवशी भरले. हे मराठीतील पहिलेच साहित्य संमेलन. साहित्याच्या मुख्य धारेतील 'अ. भा. मराठी साहित्य संमेलनां'चा इतिहासही याच संमेलनापासून मोजला जातो. पहिल्या संमेलनाचे अध्यक्ष स्वतः न्या. रानडेच होते. विशेष म्हणजे, रानडे यांनी फेब्रुवारी १८७५पासून या संमेलनाच्या संस्थात्मक उभारणीसाठी तयारी सुरु केली होती. त्यादृष्टीने, मराठीतील गद्य व पद्याची किती पुस्तके तोवर प्रकाशित झाली आहेत याची एक सूची बनविण्याचेही काम रानडे यांनी सुरू केले. त्या काळात मराठी गद्याची सुमारे ४३१, तर पद्याची २३० पुस्तके मराठीत होती! दुसरे संमेलन बऱ्याच काळाने (१८८५) भरले, तेव्हा महात्मा जोतिबा फुले यांनी अशा संमेलनांवर केलेल्या टीकेमुळे विद्रोही साहित्याचा इतिहास बळकट झाला. **१९०६:-** इतिहास विषयक लेखक शंकर दामोदर चितळे यांस जन्म. ङ्ग्रेंच राज्यक्रांती : सन १७८९ 'इटलीचे स्वातंत्र्ययुद्ध' या पुस्तकांशिवाय 'हिंदुस्थानच्या इतिहासाचे अंतर्गत दर्शन' अर्थात हिंदुस्थानचा साधनरुपी इतिहासफ, 'आमचा महाराष्ट्र देश', 'भारताचा सांस्कृतिक इतिहास' ही ऐतिहासिक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९२१:-** भाषांतरकार बापू पुरुषोत्तम जोशी यांचे निधन. 'क्रिमिनल प्रोसिजर कोड', 'पिनल कोड : सिव्हिल प्रोसीजर कोड' या कायदेविषयक इंग्रजी ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले. **१९३२:-** लेखक वसंत गोळेकर यांचा जन्म. यांनी 'एकलव्य' ही तत्त्वबोधपर कादंबरी आणि 'शेवटची सरहद्द' हर मानसशास्त्र विषयक कांदबरी लिहिली. **१९३५:-** लेखक, गणितज्ञ प्रा. मनोहर कृष्ण केळकर यांचा जन्म. सुलभ गणित भाग १,२ ही पाठयपुस्तके त्यांच्या नावावर आहेत. **१९३७:-** गीतकार वामनराव शिवरामजी रामटेके यांचा जन्म. यांचा 'भीमबद्ध गीतमाला' हा कव्वालीसंग्रह आणि 'महापुरुष गौरवगीत' हे गीतसंग्रह प्रकाशित झाले आहेत. **१९४०:-** लेखक, कृषिसंशोधक प्रा. डॉ. भीमराज गोपाळ भुजबळ यांचा जन्म. 'द्राक्षबाग' हा द्राक्ष या विषयावर मराठीतून पहिला ग्रंथ. **१९५८:-** नाटककार व नट नागेश रामचंद्र जोशी यांचे निधन. रंगभूमीच्या त्या काळात छोटा गंधर्व व शंकर आपटेसह 'कलाविलास' ही व्यावसायिक नाट्यसंस्था स्थापून त्यांनी 'देवमाणूस', 'मैलाचा दगड', 'कामगार संप व मजुरीच्या एकजुटीवरील 'सं. विजय, अंतरपाट' अशी नाटके लिहिली होती. **१९६८:-** साहित्यिक नरेंद्र लांजेवार यांचा जन्म. अभिव्यक्तीची क्षितिजे, साहित्य अभिव्यक्तीची स्पंदने, साहित्यिकी स्पंदने, कंठापूर, आमच्या गोष्टी, बालानुभव, एकाच नाण्याच्या तीन बाजू यासह त्यांची विविध विषयांवर विविध पुस्तके प्रसिध्द झाली. तसेच ते अंधश्रध्दा निर्मूलनाच्या कार्यात ते सहभागी होते. लहान मुलांसाठी शासकीय अनुदानाशिवाय पन्नास ग्रंथालय सुरु केली १३ फेब्रुवारी २०२२ रोजी त्यांचे निधन झाले. **१९८४:-** मराठी साहित्यात चरित्रकार म्हणून ठसा उमटवणाऱ्या धनंजय कीर यांचे निधन. मुंबई महापालिकेत शिक्षण खात्याची नोकरी सांभाळून मराठी साहित्याची फार मोठी सेवा त्यांनी केली. १९४५च्या सुमारास 'फ्री हिंदुस्थान' मधील राजकीय पुढाऱ्यांची त्यांनी लिहिलेली व्यक्तिचित्रे गाजली. 'स्वा. सावरकर' हा त्यांचा पहिला चरित्रग्रंथ. त्यानंतर 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर, लो.टिळक, म. फुले, शाहू महाराज' मिळून १२ थोर पुरुषांची चरित्रे त्यांनी लिहिली. तसेच 'कृतज्ञ मी कृतार्थ मी' या नावाने स्वतःचे आत्मचरित्रही लिहिले.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

**निवडक**

## दहावी परीक्षेच्या शुल्कात वाढ

**पुणे :** इयत्ता दहावीच्या परीक्षा शुल्कात वाढ करण्याचा निर्णय राज्य मंडळाने घेतला आहे. विद्यार्थ्यांना ४७० रुपये परीक्षा शुल्क, २० रुपये प्रशासकीय शुल्क, २० रुपये गुणपत्रिका लॅमिनेशनसह शुल्क, २० रुपये प्रमाणपत्र शुल्क, १० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (शास्त्र विषय), १०० रुपये प्रात्यक्षिक परीक्षा शुल्क (तंत्र शिक्षण), १३० रुपये खासगी विद्यार्थी नाव नोंदणी अर्ज, खासगी विद्यार्थी नोंदणी शुल्क एक हजार २१० रुपये, असे शुल्क आकारले जाणार आहे.

## इसमाचा आढळला मृतदेह

**पनवेल :** पनवेल रेल्वे पार्कींगच्या मोकळ्या जागेत एका वृद्ध इसमाचा मृतदेह आढळून आला असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत. सदर इसमाचे अंदाजे वय ६० वर्षे असून, डोक्याचे केस पांढरे, दाढी मिशी वाढलेली व पांढरी, बांधा मध्यम, उंची अंदाजे ५ फुट असून अंगात पांढऱ्या रंगाचा फुल बाह्याचा शर्ट व लाल रंगाची चौकडीची लुंगी घातलेली आहे. या इसमाबाबत माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे यांच्याशी संपर्क साधावा.

## सोन्याची बांगडी केली लंपास

**पनवेल :** एसटीमध्ये चढत असताना एका वृद्ध महिलेच्या हातातील सोन्याची बांगडी अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना पनवेल एसटी स्थानक परिसरात घडली आहे. राजेश्री पाटील या पनवेल एसटी स्थानकामध्ये उभ्या असलेल्या कर्जत बसमध्ये चढत असताना अज्ञात चोरट्यांनी मोठ्या चलाखीने त्यांच्या हातातील ८० हजार रुपये किंमतीची सोन्याची बांगडी लबाडीने काढून घेवून तो पसार झाला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## ३० लाखांची फसवणूक

**पनवेल :** विचुंबे येथे राहणाऱ्या एका ४२ वर्षीय महिलेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून तिची ३० लाख रुपयांची फसवणूक ऑनलाईन पद्धतीने केली आहे. याबाबतचा गुन्हा मंगळवारी नवी मुंबई पोलिसांच्या सायबर पोलीस ठाण्यात नोंदविण्यात आला आहे. विचुंबे येथे राहणारी महिला घरी असताना तिला फेसबुकवरुन संपर्क साधण्यात आला. फेसबुकवरील व्यक्तीने संबंधित महिलेचा विश्वास संपादन केल्यानंतर तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकवल्याचे महिलेने पोलिसांना दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

## विज्ञान शिबीर संपन्न

**खांब :** ५ मे ते ८ मे या कालावधीत ज्ञानप्रबोधिनी पुणे येथे संपन्न झालेल्या विज्ञान शिबिरात रोह्यातील विद्यार्थ्यांनी महत्वपूर्ण सहभाग नोंदवून विविध वैज्ञानिक बाबी व अन्य शैक्षणिक बाबींचा अभ्यास केला. एक्सेल कंपनी व श्री विवेकानंद रिसर्च ट्रेनिंग इन्स्टिट्यूट रोहा यांच्या सहयोगाने निवासी विज्ञान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यामध्ये रोहा तालुक्यातील ईश्वरी अधिकारी, प्रांजली सावरकर, हर्ष पैर, प्रतुळ कांबळे, अश्वित जंगम, सार्थक गोसावी आदी विद्यार्थी सहभागी झाले होते.

# उन्हाळी भात क्षेत्रात कमालीची घट !

### १२०० हेक्टर पैकी १२० हेक्टरवर भातपिक उभे; गुरांच्या चाऱ्याचाही प्रश्न ऐरणीवर

**। माणगाव । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा हा एकेकाळी भाताचे कोठार म्हणून ओळखला जात होता. मात्र डोलवहाळबंदाऱ्यातील कालवा ठीकठिकाणी नादुरुस्त झाला आहे. तर शासनाकडून या कालव्याची साफसफाई करण्यासाठी पुरेशी यंत्र सामुग्री मिळत नसल्याने माणगाव तालुक्यातील शेवटच्या शेतीपर्यत पाणी पोहचत नसल्याने उन्हाळी रब्बी हंगामातील पिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस घटत चालले आहे. त्यामुळे नागरिक, शेतकऱ्यातून कमालीची चिंता पसरली आहे. शेती विविध कारणांनी अडचणीत येवू लागली आहे.



काही शेतकऱ्यांनी भात पिकाऐवजी कडधान्ये मोठ्या प्रमाणात पिकवण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे. आधीच औद्योगिकीकरणामुळे शेती अडचणीत सापडली असून उरली सुरली शेतीमध्ये उन्हाळी भात पीक घेण्याकडेही शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे १२०० हेक्टर पैकी १२० हेक्टरवर भातपिक माणगाव तालुक्यात उभे असून १०८० हेक्टरवरील भातपिकाला फटका बसला असून गुरांच्या चाऱ्याचाही प्रश्न मोठ्या प्रमाणात ऐरणीवर आला आहे.

तालुक्यात बहुतांशी ठिकाणी भात कापणीला सुरवात झाली आहे. रब्बी हंगामातील भाताचे पीक हे शाश्वत पिक म्हणून शेतकरी या मुख्य पिकाकडे मोठया प्रमाणात वळतो. मात्र यंदाच्या वर्षी काळ प्रकल्पाच्या कालव्याला मुदतीत पाणी न सोडल्याने माणगाव तालुक्याला भाताचे कोठार म्हणून असलेली ओळख यंदाच्या वर्षी पुसट होत आहे.

दिवसेंदिवस भाताचे रब्बी हंगामातील भात पिकाचे क्षेत्र घटत आहे. ही रायगड जिल्ह्यासाठी चिंतेची बाब आहे. यंदाचे वर्षी १२० हेक्टरवर भात लागवड केली आहे. माणगाव तालुक्यातील उन्हाळी हंगामातील हजारो हेक्टर क्षेत्रातील रब्बी पिकाचे उत्पादनात कमालीची घट झाली असून यंदा भात पिकाच्या उत्पादनावर चांगलीच संक्रांत कोपली आहे. तर यंदाचे वर्षी १३५० हेक्टरवर कडधान्ये शेतकऱ्यांनी लावले होते.

कोकणातील माणसांचे मुख्य अन्न भात हे असून रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यातील शेतकऱ्यांनी यंदाचे वर्षी १२० हेक्टर म्हणजेच ३०० एकरवर भात पिक लावणी झाली आहे. गेल्या पाच वर्षापूर्वी मोठ्या प्रमाणात भात पिक घेतले जात होते. दिवसेंदिवस या क्षेत्रात घट होत असून सध्या स्थितीत कालवा पाण्यामुळे १ हजार हेक्टर क्षेत्र पडून आहे.

गेल्या वर्षी सन २०२२-२०२३ मध्ये हेक्टरी उत्पादन ४० क्विंटल प्रमाणे ४४ हजार ४०० क्विंटल सरासरी उत्पन्न शेतकऱ्यांना मिळाले होते. गेल्यावर्षी सन २०२२-२३ मध्ये ९८ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाच्या उत्पादनात घट होवून ३८ क्विंटल उत्पादन मिळू शकले. म्हणजेच २९४० क्विंटल उत्पादन शेतकऱ्यांना मिळणे अपेक्षित होते. पर्यायाने तालुक्याच्या आर्थिक उत्पन्नावर परिणाम होत असून याचा फटका जिल्ह्याच्या बाजारपेठेलाही बसणार आहे. भात या मुख्य पिकाबरोबरच शेतकऱ्यांनी कडधान्याचे पिकही मोठ्या प्रमाणात घेतले आहे.

यंदा वाल ७०० हेक्टर, मूग ३५० हेक्टर, हरभरा २०० हेक्टर, मटकी १०० हेक्टर एकूण १३५० हेक्टर तर कलिंगड ५०० हेक्टर, भाजीपाला १०० हेक्टरवर पिक घेतले. दरवर्षी १५ डिसेंबर रोजी कोकण हंगाम पिकासाठी काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगावमधील शेतीला सोडण्यात येते. यंदाचे वर्षी हे पाणी ५ जानेवारीला कालव्याला दरवर्षी पेक्षा २० ते २५ दिवस उशिरा सोडल्यामुळे शेतकरी नाराज होता. उन्हाळी भात पिक हे शाश्वत पिक म्हणून शेतकरी पाहतो. त्याचबरोबर गुरांच्या चाऱ्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

यंदाचे वर्षी माणगाव तालुक्यात भात पिकाची लागवड १२० हेक्टर क्षेत्रावर केली यंदा भाताची क्षेत्र कमी झाले असले तरी कडधान्याच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. यंदा कडधान्य चवळी, वाल, मुग, त्याचबरोबर कांही शेतकऱ्यांनी तूर, उडीद, हरभरा भुईमुग, तीळ तसेच भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. तसेच शेती व्यावसायाला पूरक नगदी पिक म्हणून कलिंगड मोठ्या प्रमाणात पिकवले आहे. भाताची ओळख माणगावची पुसट होत असली तरी कडधान्य आणि कलिंगडाच्या विक्रमी उत्पादनातून ती ओळख गडद होत आहे.

## कर्जत रेल्वे स्थानकातील वृत्तपत्र स्टॉल बंद

**। नेरळ । वार्ताहर ।**

मध्य रेल्वेच्या मेनलाईनवरील कर्जत या महत्वाच्या स्थानकात पॅसेंजर गाड्यांची ये जा असलेल्या फलाटावर असलेले वृत्तपत्र आणि पुस्तके मिळणारे स्टॉल दहा ते बारा वर्षापासून बंद आहे.

हक्काने वृत्तपत्र मिळतील असे हे ठिकाण गेली अनेक वर्षे बंद असल्याने रेल्वेकडून त्या ठिकाणी नवीन वृत्तपत्र विक्रेत्यास यास व्यवसाय करण्याची संधी देण्यात आल्यास दूरवर जाणाऱ्या प्रवाशांना पुस्तके आणि वृत्तपत्र उपलब्ध होऊ शकतात.

मुंबईकडून पुणे आणि दक्षिण भारतात जाणाऱ्या एक्स्प्रेस गाड्या या कर्जत रेल्वे स्थानकात घाटातून प्रवास सुरू करण्याआधी अतिरिक्त इंजिन लावण्यासाठी किमान पाच मिनिटे थांबतात. त्यातील काही गाड्यांना कर्जत रेल्वे स्थानकातील थांबा हा टेक्निकल असतो.मात्र पुण्याकडे जाणाऱ्या सर्व एक्स्प्रेस गाड्या किमान पाच मिनिटे कर्जत स्थानकात थांबतात आणि त्यामुळे प्रवासी हे स्थानकात वेगवेगळ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी थांबून राहतात.


त्यावेळी दूरचा प्रवास असल्याने प्रवासी हे कर्जत स्थानकात असलेल्या वृत्तपत्र स्टॉलवरील पुस्तके आणि वृत्तपत्र यांची मोठ्या प्रमाणात खरेदी करायचे.सकाळी सहा ते सायंकाळी सात वाजेपर्यंत हे वृत्तपत्र स्टॉल सुरू असायचे.मात्र २०१२ मध्ये हे वृत्तपत्र स्टॉल बंद पडले आणि आजही ते केंद्र बंदच आहे.

कर्जत सारख्या दक्षिणेकडे जाणाऱ्या गाड्यांच थांबा असलेले महत्वाचे स्थानक वृत्तपत्र स्टॉल कायम बंद असलेले स्थानक आहे. मध्य रेल्वे प्रशासनाने त्या ठिकाणी ठेकेदार असलेल्या कंपनीला वृत्तपत्र स्टॉल सुरू करण्यासाठी सूचना करायला सांगावे किंवा नवीन ठेकेदार नेमून वृत्तपत्र स्टॉल पुन्हा नव्या दिमाखात सुरू व्हायला हवे अशी मागणी प्रवासी करीत आहेत.

## तापमानवाढीमुळे सुपारीचे पीक धोक्यात

**। मुरूड-जंजिरा । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील तापमानाचा पारा चाळीस अंशावर गेल्यामुळे येथील सुपारीचे पीक धोक्यात आले आहे. वाढत्या तापमानामुळे सुपारीच्या झाडांना नुकतीच फलधारणा होऊन तयार झालेली छोटी छोटी फळे गळून पडू लागली असून सुपारीच्या छोट्या झाडांच्या पानांवर (झावळ्यांवर) करपा सदृश रोग पडल्याचेही दिसून येत आहे. त्यामुळे सुपारी पीक धोक्यात आले आहे.



मुरूड तालुक्यात ४१६ हेक्टरवर सुपारीची लागवड करण्यात आली असून जवळपास १५०० सुपारी बागायतदार आहेत.ते सर्वजण प्रती वर्षी ४०० ते ४५० खंडी (१ खंडी = ४०० की.ग्रॅ.)असोली सुपारी पिकवतात. निसर्ग वादळात सुपारीचे १४१ .३६ हेक्टर क्षेत्र बाधीत झाल्यामुळे या उत्पादनात मोठी घट आली झाली आहे.त्यात सुपारीच्या झाडांसह फळेही दरवर्षी त्यांना ग्रासणाऱ्या विविध रोगांना बळी पडत आहेत.

चालूवर्षी तर तापमानाने उच्चांक गाठला. एप्रिल महिन्याच्या अखेरीस तर तापमानाने चाळीस अंशाचा आकडाही पार केला होता. सुपारीच्या झाडांना अति उष्णता सहन होत नाही.याच हंगामात या वाड्या बागायतींमधील झाडांना पाणी पुरवठा करण्यासाठी खोदण्यात आलेल्या विहिरी तळ गाठतात.यावेळी पाणी काढण्यासाठी विहिरींवर बसवण्यात आलेले पंप पाण्याचा उपसा करताना नजिकच्या समुद्राच्या पाण्यातील क्षार खेचतात क्षारयुक्त पाणी व वाढत्या तापमानाचा वाईट परिणाम सुपारी झाडे-फळांवर होऊन फळ गळ, करपासारख्या रोगांना ती बळी पडत आहेत व उत्पादनात घट होत आहे. फेब्रुवारी -मार्च महिन्यात झाडांना लागलेली छोटी छोटी फळे तप्त वातावरणात गळू लागतात. या कालावधीत पाण्याची कमतरता भासल्यास गळ अधिक होते. बागायतदारांचे अतोनात नुकसान होते.या खेरीज सुपारी झाडांना भेडसावणाऱ्या अन्य अनेक रोगांनीही या उत्पादनावर परिणाम होत आहे. या सर्व रोगांवर दापोलीच्या कृषी विद्यापीठांतून संशोधन होऊन त्यावरील उपाययोजनांची माहिती बागायतदारांना करुन देणे गरजेचे आहे.

## पळालेल्या पाच मुलांना पोलिसांनी शोधले

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

कळंबोली येथील फूडलॅण्ड कंपनीजवळील आदिवासी वाडीतून पाच मुलांचे अपहरण झाल्याची तक्रार एका आदिवासी महिलेने पोलिसांकडे सोमवारी रात्री केली होती. या मुलांचा शोध घेण्यासाठी सोमवारी रात्री ते मंगळवारी दिवसभरात तीन वेगवेगळी पथके शोध घेतल्यानंतर ही मुले करंजाडे येथील मामाच्या घरात झोपल्याचे पोलिसांना आढळले. मात्रपोलिसांना पाहून पळून गेलेल्या पाच पैकी दोन मुले पुन्हा शिरढोण येथील त्यांच्या नातेवाईकांकडे लपली होती. अखेर मंगळवारी उशीरा त्यांनाही सुरक्षित कळंबोली पोलिसांनी शोधून काढून पालकांच्या स्वाधीन केले.

मागील आठवड्यात गुरुवारपासून ते शनिवारपर्यंत घराबाहेर गेलेली मुले घरी न परतल्याने रोडपाली फुडलॉण्ड कंपनीजवळील आदिवासी वाडीत राहणाऱ्या ताई वाघे यांनी त्यांच्या मुलीसह अजून चार मुलांचे अपहरण झाल्याची दिली.

कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक राजेंद्र कदम यांनी या गंभीर प्रकरणातील मुलांच्या शोधासाठी एक अधिकारी व चार कर्मचारी नेमले होते. ताई वाघे यांच्यासह त्यांचे नातवाईक व पोलीसांचे पथक मुलांच्या शोधासाठी त्यांच्या नातेवाईकांच्या घरी शोध घेत होते. पेणधर, तळोजा, शिरढोण असे नातेवाईकांच्या घरी शोधल्यानंतर करंजाडे येथील एका नातेवाईकाचे घर शोधल्यावर ही मुले पोलीसांना झोपलेल्या अवस्थेत सापडली. मात्र यामधील दोन मुलांनी त्यांना शोधायला पोलीस आल्याचे पाहील्यावर तेथून पळ काढून धूम ठोकली. मंगळवारी ही मुले शिरढोणच्या नातेवाईकांकडे सापडली.

## वैष्णवी पवार यांचे कीर्तन

**सावरट :** नागोठणेजवळच असलेल्या सावरट (तामसोली) येथे शनिवारी (दि.११) बारामती येथील सुप्रसिद्ध किर्तनकार वैष्णवीताई पवार यांच्या किर्तनाचे खास आकर्षण असणार आहे. या कार्यक्रमाची सुरूवात दुपारी ३ वाजता श्री. सत्यनारायणाच्या पुजेने करण्यात येईल. त्यानंतर सायं. ५ ते ६.३० या वेळेत ऐनघर पंचक्रोशी, बाळसई, वजरोली, पळस, कुहीरे, यांचा सामुदायिक हरिपाठ झाल्यानंतर ७ ते ९ या वेळेत सुप्रसिद्ध किर्तनकार ह.भ.प. वैष्णवीताई पवार यांचे सुश्राव्य किर्तन होणार आहे.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- प्रथम, पुर्नविवाह, व्यंग, सर्वजातीय, आंतरजातीय वेबसाईटसह स्थळांसाठी रोहा गणेश महाकाळ ८८८८९३५७७५
- अलिबाग-चोंढी येथील रिसॉर्टमध्ये कामासाठी माणसे पाहिजेत. Receptions-Housekeeping-waiter-Helper-Cook etc. संपर्क- 8208459424/9323152990 Email. csskshrisnkar@gmail.com
- Accountant पाहिजे २-३ वर्षांचा अनुभव पगार- २०,०००/- महिना ठिकाण-बामणसुरे, चोंढी contact-9823585321
- नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफ ची आवश्यकता आहे. १. वेटर २. रिसेप्शन ३. हॉटेल मॅनेजर २ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी संपर्क साधावा-(व्हॉटसअॅप वर मेसेज करावा) ८४०८८२९५५५, ७८७५८६६५५५
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/नापास ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३.
- विद्यानगर, चेंढरे येथे 2BHK टेरेस फ्लॅट विकणे आहे. क्षेत्र- १२०० Sqft. संपर्क : PROLOAN SOLUTION ९२२१६८०२८४/९७६४१४९१४३
- अलिबाग विभागासाठी सेल्समध्ये जॉब करण्यासाठी सुवर्णसंधी. फिक्स सॅलरी १५०००, २००००, २५००० + सुपर इनसेंटीव तसेच अलिबागमधील विविध शाखांसाठी होम रिव्हाईज एज्युकेशन प्रा.लि. या शैक्षणिक संस्थेत तातडीने पाहिजेत. Educational counsellors /sales executive-20, Team managers- 5, Telcaller- 3, संपर्क- ८४१९९४०००४/९३७२०७१७६९
- 'इंद्रप्रस्थ' गोंधळपाडा येथे महिला व पुरूष सफाई कामगार त्वरित पाहिजेत. कामाची वेळ सकाळी ९.३० ते सायं.६ भेटण्याची वेळ-सकाळी ११ ते सायं.५ ठिकाण-इंद्रप्रस्थ, गांवदेवी मंदिराजवळ, गोंधळपाडा माहितीकरीता संपर्क - ८१८०८६१२३४, ८१८०८५१२३४
- अलिबागमधील दुकानात कामासाठी मुलगा अथवा मुलगी हवी आहे. संपर्क : ८४२१३५४६४०
- सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८ ते १० पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य.) संपर्क : ९२८४५५५३१४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


## उंचीरोधक हटविल्याने मिळाला दिलासा

**। उरण । वार्ताहर ।**

उंची रोधकामुळे उरण-पनवेल या मुख्य मार्गावरील एसटीची प्रवासी बससेवा मागील तीन वर्षांपासून बंद आहे. हे उंची रोधक सोमवारी रात्री अखेर हटविण्यात आले आहेत. त्यामुळे बोकडवीरा, फुंडे, डोंगरी आणि पाणजे येथील हजारो नागरिकांना दिलासा मिळाला आहे. याबद्दल आनंदही व्यक्त केला जात आहे.



नवी मुंबई वाहतूक विभागाने उरण-पनवेल मार्गावरील नादुरुस्त खाडीपुलाच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले उंचीरोधक हटविण्याची अधिसूचना काढल्याने उंचीरोधक लवकरात लवकर हटविण्याची मागणी करण्यात येत होती. अखेरीस रात्रीच्या वेळी वाहतूक विभाग आणि सिडकोच्या माध्यमातून हे उंचीरोधक हटविण्यात आले आहेत. उंचीरोधकामुळे मागील तीन वर्षांपासून या मार्गावरील प्रवासी वाहतुकीचे एकमेव साधन असलेली एसटी बस सेवा बंद करण्यात आली आहे. वाहतूक विभागाने काढलेल्या अधिसूचनेनंतर सिडकोने उरण-पनवेल मार्गावर बसविण्यात आलेले बोकडवीरा आणि फुंडे हायस्कूलनजीकचे उंचीरोधक हटविण्यात आले आहेत. शेकाप तालुका चिटणीस विकास नाईक यांनी उंचीरोधक हटवण्याची मागणी केली होती.खाडीपूल दुरुस्तीसाठी बोकडवीरा ग्रामस्थ आणि जनवादी महिला संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्याला यश आले आहे. २०२१ सालापासून उरण-पनवेल मार्गावरील खाडीपूल नादुरुस्त झाला आहे.

त्यामुळे येथील बोकडवीरा, फुंडे, डोंगरी व पाणजे या चार गावातील हजारो नागरिकांना त्रास सहन करावा लागला आहे. मागील तीन वर्षांपासून बोकडवीरा मार्गे बंद करण्यात आलेली एसटी बस सेवा पूर्ववत करण्यात यावी अशी मागणी हेमलता पाटील यांनी केली आहे.

## कोलाड नाक्यावर वाहतूक कोंडी

**सुतारवाडी :** पनवेल ते इंदापूर महामार्गाचे काम धिम्या गतीने सुरू आहे. काही ठिकाणी उड्डाण पुलाचे काम सुरू असून दोनही बाजूने वाहनांना पर्यायी मार्ग दिल्याने ज्या ठिकाणी पुलाचे काम सुरू आहे अशा ठिकाणी वाहतुकीची कोंडी होत असताना दिसत आहे. कोलाड हा गजबजलेला नाका असून येथे ही उड्डाणपुलाचे काम निवडणुकीपूर्वी सुरू केले आहे. मुंबई आणि महाडकडे जाण्यासाठी मार्ग काढले आहेत. तरीसुद्धा येथे वाहनांच्या रांगा लागत आहेत. या ठिकाणी पोलीस असणे आवश्यक आहे. कोणीही बेफिकरपणे वाहन टाकणार नाही. वाहने वेगाने ही जाणार नाहीत. सध्या सुट्ट्यांचा हंगाम असल्याने येथून वाहनांची वर्दळ अधिक आहे.

## रायगडातील शिक्षक उन्हाळी सुट्टीवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणुकीचे मतदान पार पडल्यानंतर आता शिक्षकांना उन्हाळा सुटी लागणार आहे. ६ जूनपासून त्यांना सुटी लागली होती, पण निवडणुकीमुळे त्यांना कामावर यावे लागले होते. दरम्यान, १५ जूनपासून शाळा सुरू होणार असल्याने इयत्ता पाचवी व आठवीच्या वर्गावरील शिक्षकांना अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना या सुटीच्या काळात देखील शिकवावे लागणार आहे. त्यासाठी त्यांना नियमित शाळेत येण्याचे बंधन नाही, पण त्यांची परीक्षेच्या दृष्टीने त्यांच्या सोयीने पूर्वतयारी करून घ्यावी लागणार आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने आरटीई अॅक्टनुसार पहिली ते आठवीपर्यंतच्या सर्वच विद्यार्थ्यांना पास करण्याचे धोरण अवलंबले होते. त्यामुळे २०१० पासून या आठ वर्गातील एकही विद्यार्थी नापास झाला नाही. पण, दहावी, बारावीनंतर शाळा सोडून देणाऱ्यांची संख्या लक्षणीय राहिली. त्यांना उत्तीर्ण व्हावेच लागेल, अन्यथा पुन्हा त्याच वर्गात बसावे लागणार आहे. परंतु, या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना संबंधित विषय शिक्षकांनी उन्हाळा सुटीत उपचारात्मक अध्यापन करावे लागणार आहे. त्यासाठी दररोज शाळेत येण्याचे बंधन नाही.

## पन्नास रुग्णांची यशस्वी प्लास्टीक सर्जरी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड मेडिकल असोसिएशन, जिल्हा रुग्णालय अलिबाग-रायगड व चित्पावन आठवले फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने प्लास्टीक सर्जरीचा उपक्रम अलिबागमध्ये पहिल्यांदाच राबविला. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून मुंबई व पुणे येथील तज्ञ व अनुभवी डॉक्टरांनी पन्नास गरजू रुग्णांवर यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांची प्लास्टीक सर्जरी केली.




भाजलेली व्यक्ती अथवा अन्य त्वचेचे आजार असलेल्या रूग्णांवर पूर्वी मुंबई-पुणेसारख्या मोठ्या शहरात उपचार केले जात होते. मात्र अलिबागमध्ये राबविलेल्या या नाविन्य उपक्रमातून भाजल्यानंतरचे व्रण व इतर त्वचेच्या आजार असलेल्या रूग्णांना प्लास्टिक सर्जरी एक आधार बनला आहे.

या शिबिराचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांच्या हस्ते झाले. यावेळी समन्वयक जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. शीतल जोशी- घुगे, डॉ. नितीन मोकल व त्यांची प्लास्टिक सर्जरी डॉक्टरांची टीम, डॉ स्वप्ना आठवले व त्यांच्या टीम मधील डॉक्टर्स, डॉ. रविंद्र म्हात्रे, डॉ. एस. एन. तिवारी, डॉ. प्रशांत जन्नावार, डॉ. अपूर्वा कुलकर्णी, डॉ. राजाराम हुलवान, डॉ. संदेश म्हात्रे, डॉ. चंद्रकांत वाजे, डॉ. घाटे,डॉ विनायक पाटील, डॉ प्रणाली पाटील, डॉ संजीव शेटकार, डॉ संजय पाटील, श्वेता म्हात्रे, गायत्री म्हात्रे, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मंदार वर्तक, दिलीप जैन, परिचारिका, रुग्ण व त्यांचे नातेवाईक, तसेच सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. ज्येष्ठ प्लास्टिक सर्जन डॉ. नितीन मोकल, डॉ. स्वप्ना आठवले व त्यांचे सहकारी, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अंबादास देवमाने व अलिबाग येथील सर्जन, भुलतज्ञ, भिषक, बालरोगतज्ञ, जिल्हा रुग्णालयातील परिचारिका व इतर कर्मचारी यांच्या सहकार्याने हा शिबीर पार पडला. भाजल्यानंतरचे व्रण, अतिरिक्त बोटं, जन्मतःच असणारी ओठातील भेग, जिभेखाली असणाऱ्या नसांच्या अडचणी, मस यासारख्या विविध विकारांवर शस्त्रक्रियेद्वारे उपचार झाले.

## लक्ष्मीबाई भोईर यांचे निधन

**खांब :** रोहा तालुक्यातील देवकान्हे गावच्या रहिवाशी असणाऱ्या लक्ष्मीबाई नथुराम भोईर यांचे सोम दि. ६ मे रोजी वृद्धापकाळाने राहत्या घरी निधन झाले.



लक्ष्मीबाई भोईर या मनमिळाऊ व परोपकारी वृत्तीच्या होत्या. आपले परिवार व गावातील प्रत्येक कार्यक्रमात त्यांचा नेहमीचाच मोठा वाटा असायचा. त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रियाविधी बुध.दि.१५ मे रोजी तर अंतिम धार्मिकविधी विधी शुक्र.दि.१७ मे रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार आहेत.

# निसर्गरम्य क्रोएशिया

सफर देशांची

फुटबॉल संघाच्या कामगिरीमुळे हा छोटासा देश सगळ्यांना माहीत झाला आहे. पण क्रोएशियाबद्दल आपणही जाणून घेऊ. क्रोएशिया हा युरोप खंडातला छोटासा देश. खूप पूर्वी क्रोएशिया हा हंगेरी या देशाचा भाग होता. क्रोएशियाची संस्कृती ही ग्रीक, रोमन संस्कृतींनी प्रभावित आहे. ऐतिहासिक काळापासून अनेक प्रभावशाली व्यक्तींची क्रोएशिया जन्मभूमी आहे. त्यांच्यामध्ये तीन नोबेल पुरस्कार विजेत्यांचा समावेश होतो. १९१८ मध्ये हा भाग युगोस्लाव्हियाला जोडण्यात आला. १९९१ मध्ये तो युगोस्लाव्हियापासून स्वतंत्र झाला आणि क्रोएशिया म्हणून ओळखला जाऊ लागला. स्वातंत्र्यानंतर क्रोएशिया आणि सर्बिया या दोन देशांमध्ये युद्ध झालं. या युद्धात क्रोएशियाचं बरंच नुकसान झालं. इथे खूप गरीबी होती. पण त्यानंतर हा देश पुन्हा उभा राहिला. झाग्रेब ही क्रोएशियाची राजधानी. ४४ लाख ४८ हजार एवढी या देशाची लोकसंख्या आहे. २१,८२९ चौरस मैल एवढा भूभाग आहे. क्रोएशियन ही इथली अधिकृत भाषा आहे. हा निसर्गसौंदर्याने नटलेला देश आहे. या देशात आठ राष्ट्रीय उद्यानं आणि एक हजारांच्या आसपास बेटं आहेत. क्रोएशियन क्युना हे इथलं चलन आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने क्रोएशियाचा जगात १२७ वा क्रमांक लागतो. या छोट्याशा देशात डोंगरदऱ्या आहेत, पठारं आहेत, जंगलं आहेत. तसंच समुद्रकिनारेही आहेत. यामुळे या देशात वेगवेगळ्या प्रकारचे प्राणी आढळतात. ससे, कोल्हे, लांडगे, रानमांजरं, रानमेंढ्या, अस्वलं इथे आढळतात. क्रोएशिया ॲड्रियाटिक समुद्राच्या किनारी वसला आहे. क्रोएशियामध्ये पर्यटक मोठ्या संख्येने येतात. समुद्रकिनारे हे इथलं प्रमुख आकर्षण आहे. २०१३ मध्ये हा देश युरोपियन युनियनचा भाग झाला. पण इथे क्युना या चलनाचा वापर केला जातो.




# ओळख स्वयंपाकघराची

शिका काही



दोस्तांनो, सुट्ट्यांमध्ये रोज नवीन कोणते खेळ खेळायचे हा प्रश्न तुम्हाला पडत असेल. यावर उपाय असा की, तुम्ही स्वयंपाकघरामध्ये छोट्या छोट्या रेसिपीज करायला शिकू शकता. गॅसचा कमीतकमी वापर असणाऱ्या सोप्या रेसिपी तुम्हाला जमू शकतात. शाळा सुरू असताना आई तुम्हाला स्वयंपाकघरामध्ये लुडबूड करू देत नाही. पण सुट्टीचा फायदा घेऊन तुम्ही थोडा थोडा खाऊ करायला शिकू शकता.
हे करत असतानाच तुम्ही आणखी एक गोष्ट करू शकता ती म्हणजे कडधान्य, तृणधान्य, पिष्टमय पदार्थ, स्निग्ध पदार्थ या घटकांशी गट्टी करायला शिका. ते ओळखायला शिका. आईला विचारून कडधान्यांच्या काही पौष्टिक रेसिपीज तुम्ही अगदी सहज करून बघू शकता. पुस्तकामध्ये नेहमीच कडधान्यांबद्दल वाचता, चित्र बघता. पण आता ही सगळी पौष्टिक धान्यं बघितली, त्याची चव प्रत्यक्ष चाखली तर तुम्हाला अधिक ज्ञान मिळेल.

मुलांनो, स्वयंपाक शिकण्याबरोबरच स्वयंपाकघर आवरणे हेही महत्त्वाचे आणि शिकण्यासारखे आहे. आपली आई जेवणाची तयारी बरीचशी आधी सुरू करते. त्यामुळे तिला भाजी निवडून देणे, कांदा, बटाट्याच्या साली सोलून देणे, लसूण सोलून देणे अशी छोटी पण महत्त्वाची कामं तुम्ही नक्कीच करू शकता. कणीक मळून ठेवलेले असेल तर त्याच्या छोट्या छोट्या पोळ्या सुद्धा करून बघू शकता. थोडक्यात तुम्ही सुट्टी मस्त एन्जॉय तर करालच पण या निवांत काळात नवीन काही शिकण्याचाही प्रयत्न करा.

# बो ताओशी आणि एक्सट्रिम आयर्निंग

फन टाईम

'बो ताओशी' हा जपानी खेळ आहे. या खेळात प्रतिस्पर्ध्याचा खांब खालच्या दिशेला वाकवायचा असतो. हा खेळ जपानमधल्या शाळांमध्ये तसंच सैन्य प्रशिक्षण संस्थांमध्ये खेळला जातो. हा बराच धोकादायक खेळ आहे. सैनिकांच्या प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून बो ताओशी ही संकल्पना मांडण्यात आली होती. हळूहळू खेळ म्हणून ही संकल्पना लोकप्रिय झाली. बो ताओशीच्या एका संघात १५० लोक असतात. यातले ७५ लोक आक्रमण करतात तर ७५ लोक खांबाचा बचाव करतात. हा खेळ खेळताना पायात बूट घालता येत नाहीत तसंच हा खांब जमिनीतून उपटता येत नाही. या खेळाचा व्हिडिओ यू ट्यूबवर बघता येईल.



कपड्यांना इस्त्री केली जाते. पण हीच इस्त्री करण्यासाठी तुम्हाला डोंगरमाथ्यावर जावं लागलं, बोटीत बसून इस्त्री करावी लागली तर? 'एक्सट्रिम आयर्निंग' या खेळात असं घडतं. या खेळात सहभागी होणारे लोक कपडे आणि इस्त्री करण्याचा बोर्ड सोबत नेतात. अगदी डोंगराच्या कड्यावर जाऊन इस्त्री केली जाते. काही लोक तर बोटीतही इस्त्री करतात. हा जगातला एक धोकादायक खेळ मानला जातो. अशा प्रकारे कपड्यांना इस्त्री करताना मजा येईल!

# 'स्विफ्ट' ची मदत घ्या

नवे जाणून घ्या

स्विफ्ट ही एक संक्षिप्त भाषा आहे जी वेगाने वाढत आहे आणि लोकप्रियता मिळवत आहे. सुरुवातीला फक्त मूळ आयओएस डेव्हलपमेंटसाठी विकसित केलेली ही भाषा आता प्रोग्रामर विंडोज आणि लिनक्स सारख्या ऑपरेटिंग सिस्टमसाठी तसेच सुरक्षित आणि वापरण्यास सुलभ कोड लिहिण्यासाठीही वापरली जाते. आता यासाठी स्विफ्ट वापरतात.




ॲपल कंपनीने स्विफ्ट, एक ओपन-सोर्स प्रोग्रामिंग भाषा तयार केली. सी वर आधारित सी, सी ++, आणि सी या भाषांव्यतिरिक्त स्विफ्ट ही भाषा तुम्ही वापरू शकता. २०१४ मध्ये ती तयार केली गेली आणि २०१५ मध्ये लोकांसाठी खुली केली गेली. अल्पावधीतच जगभरात सर्वाधिक वापरल्या जाणाऱ्या भाषांपैकी स्विफ्टने प्रोग्रामिंग भाषा म्हणून २० वे स्थान पटकावले आहे. प्रोग्रामर्समध्ये ही १४ वी लोकप्रिय भाषा म्हणून ओळखली जाते. स्विफ्ट मॅकओएस व्यतिरिक्त विंडोज आणि लिनक्सवर उपलब्ध आहे. परिणामी, स्विफ्ट शिकण्यासाठी तुम्हाला मॅकची आवश्यकता नाही. पण आयओएस ॲप्लिकेशन्स तयार करण्यासाठी तुम्हाला मॅक आवश्यक असेल. कारण तुम्हाला कोड वापरण्याची आवश्यकता असेल.

'स्विफ्टमध्ये प्रोग्रामिंग सुरक्षित, जलद आणि वापरण्यासाठी तुलनेने सोपे आहे. स्विफ्टमध्ये प्रोग्रामिंग शिकणे इतर भाषांपेक्षा अधिक सोपे आहे आणि तुम्हाला भाषा शिकण्यासाठी आणखीनही साधने सापडतील. ती शोधा आणि या सुट्टीमध्ये ही प्रोग्रामिंग भाषा शिकून घ्या.

# इंग्रजी बोलणे शिकण्यासाठी...

स्मार्ट ट्रिक्स

मुलांनो, आता इंग्रजी बोलणे, लिहिणे आणि समजणे ही काळाची गरज बनली आहे. लवकरच तुम्ही पास होऊन पुढच्या इयत्तेत जाल. मग काही दिवसांनी पुढचे शिक्षण घ्याल. तेव्हा कॉलेजपासून ऑफिसपर्यंतच्या सर्व आवश्यक कामांमध्ये इंग्रजी भाषा वापरली जाते. आजकाल इंग्रजी भाषा शिकण्यासाठी अनेक ऑनलाइन अभ्यासक्रमही उपलब्ध आहेत. याशिवाय असे अनेक मार्ग आहेत ज्याद्वारे तुम्ही घरी बसून इंग्रजी बोलणे, लिहिणे आणि समजणे शिकू शकता.



✻ इंग्रजी लिहिता, बोलता यावे यासाठी त्याबद्दलचा न्यूनगंड दूर करणे आवश्यक आहे. इंग्रजी बोलायला शिकायचे असेल तर दररोज किमान १०-२० शब्द, त्यांचे स्पेलिंग आणि अर्थ माहीत करुन घेणे आवश्यक आहे. शब्द लक्षात ठेवल्याशिवाय तुम्ही इंग्रजी कधीही शिकू शकत नाही.

✻ सोपे शब्द प्रयोग असणारी इंग्रजी पुस्तके विकत घ्या. तुमच्या आवडीची गोष्टींची पुस्तके वाचा. ज्यामुळे गोष्टी वाचताना तुम्हाला नवे शब्द कळू शकतील.

✻ तुम्ही तुमचे मित्र, कुटुंब आणि मित्रांशी इंग्रजीत बोलू शकता. यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल आणि या भाषेत सहज संवाद साधायला शिकाल.

✻ इंग्रजी बोलण्यासाठी आणि समजण्यासाठी ते ऐकणे देखील आवश्यक आहे. त्यामुळे इंग्रजी गाणी ऐका, पॉडकास्ट ऐका आणि चित्रपटही पहा. आठवडाभरात तुम्हाला फरक जाणवू लागेल.

✻ रोज इंग्रजीत काही ना काही लिहिण्याचा सराव ठेवा. स्वतःसाठी काही उद्दिष्टे ठेवा आणि ती साध्य करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करा. तुम्ही मराठी ते इंग्रजी भाषांतर देखील करू शकता. अशाप्रकारे बघता बघता तुम्ही या भाषेत पारंगत व्हाल.

# आवाज न करणारा कॉम्प्युटर

स्मार्ट टॉक



कॉम्प्युटर, लॅपटॉप सुरू होताना, बंद होताना तसंच वापरताना थोडाफार आवाज होतो. इस्रायलमधल्या कॉम्प्युटर बनवणाऱ्या 'कॉम्प्युलॅब' या कंपनीने 'लिनक्स ऑपरेटिंग सिस्टिम'वर काम करणारा सायलंट मिनी कॉम्प्युटर बाजारात आणला आहे. या कॉम्प्युटरचा अजिबात आवाज होणार नाही. 'मिंट बॉक्स मिनी २' या सिस्टिममध्ये कोणताही पंखा बसवण्यात आलेला नाही. त्यामुळे त्यातून कोणताही आवाज येण्याचा प्रश्नच नाही. यात मेटल हाउसिंग तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. यामुळे कॉम्प्युटर लवकर थंड होतो. तसंच ० ते ४५ अंश सेल्सियस तापमानातही व्यवस्थित काम करतो. या कॉम्प्युटरचं वजन अवघं २५० ग्रॅम आहे. यात क्वाड कोअर इंटेल सॅलरोन जे ३४५५ प्रोसेसर लावण्यात आला आहे. यात चार जीबी रॅम आणि ६४ जीबी स्टोरेज देण्यात आलं आहे. यात दोन यूएसबी पोर्ट आहेत. तसंच दोन मिनी डिस्प्ले पोर्टही देण्यात आले आहेत. या कॉम्प्युटरची किंमत २३,९०० रूपयाच्या आसपास आहे.याचा आकारही खूप छोटा आहे. त्यामुळे तो खूप कमी जागा व्यापेल. कोणताही आवाज न करता सुरू होणं हे या कॉम्प्युटरचं प्रमुख वैशिष्ट्य आहे.

# रोबोटिक्समध्ये आहेत संधी!

कोण होणार?



तंत्रज्ञानात बरीच प्रगती होत आहे. तुम्हालाही तंत्रज्ञानाची आवड असेल तर रोबोटिक्सची निवड करता येईल. रोबोटिक्स हे वेगाने वाढणारं क्षेत्र आहे. इथे करीअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. भारतातही रोबोटिक्स मोठ्या प्रमाणावर विस्तारत आहे. बांधकाम, उत्पादन तसंच आरोग्य या क्षेत्रांमध्ये रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे. तसंच या क्षेत्रांमध्ये रोबोटिक्सचा वापर करण्याची खूप मोठी संधीही आहे. शस्त्रक्रियेच्या क्षेत्रातही रोबोटिक्सची मागणी खूप वाढणार आहे. २०१७ ते २०२५ या काळात देशात सर्जिकल रोबोटिक्सच्या बाजारपेठेत २० टक्के वाढ अपेक्षित आहे.

'मेक इन इंडिया' तसंच 'डिजिटल इंडिया'सारख्या मोहिमांमुळेही बांधकाम क्षेत्रात रोबोटिक्स तंत्रज्ञानाचा वापर वाढताना दिसत आहे. त्यामुळे भविष्यात रोबोटिक्सची निवड करून तुम्हाला खूप मोठी भरारी घेता येईल. मे २०१५ ते २०१८ या काळात रोबोटिक्समधल्या नोकऱ्यांमध्ये १९१ टक्के वाढ नोंदवण्यात आली. तसंच या क्षेत्रात नोकरी शोधणाऱ्यांच्या संख्येत १८६ टक्के वाढ झाली आहे. या सगळ्याचा विचार केला तर रोबोटिक्समधलं भवितव्य उज्ज्वल आहे असं म्हणता येईल.




## ओळखा पाहू...

जिज्ञासा

१) २०१८ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या देशाने जिंकला
२) उणे ६२ अंश सेल्सियस नोंद करणारं ओयीमियाकॉन हे गाव कोणत्या देशात आहे
३) विम्बल्डन २०१८ च्या पुरूष एकेरीचं विजेतेपद कोणी पटकावलं होतं?
४) २०१८ ची अझलन शाह हॉकी स्पर्धा कोणत्या देशाने जिंकली होती?
५) भारतातली पहिली हेलिकॉप्टर शटल सेवा कोणत्या शहरात सुरू झाली?
६) जागतिक जल दिन कधी असतो?
७) टी-२० सामन्यांमध्ये ३०० षटकार ठोकणारा पहिला भारतीय क्रिकेटपटू कोण?
८) नाटोचं सदस्यत्त्व स्वीकारणारा पहिला दक्षिण अमेरिकन देश कोणता?
९) २०२६ चा फुटबॉल विश्वचषक कोणत्या खंडात होणार आहे?
१०) जगातली सर्वात मोठी मोबाईल फॅक्टरी भारतातल्या कोणत्या शहरात सुरू झाली आहे?

उत्तरः १) फ्रान्स २) रशिया ३) नोवाक जोकोविच ४) ऑस्ट्रेलिया ५) बंगळुरू ६) २२ मार्च ७) रोहित शर्मा ८) कोलंबिया ९) उत्तर अमेरिका १०) नोएडा

## ठिपके जुळवा



# का येते चक्कर?

हेल्थ वेल्थ


चक्कर येण्याबद्दल तुम्ही ऐकलं असेल. अनेक कारणांनी आपल्याला चक्कर येते. मज्जासंस्था तसंच रक्ताभिसरण प्रक्रियेत काही अडथळे आल्याने काही काळासाठी मेंदूला कमी प्रमाणात रक्तपुरवठा होतो. मेंदूला कमी रक्तपुरवठा झाला की आपल्याला गरगरल्यासारखं वाटतं. चक्कर येते. काहीजण बेशुद्ध पडतात. आडवं झोपवल्यानंतर माणसाचं हृदय आणि मेंदू सरळ रेषेत येतात. यामुळे मेंदूला नीट रक्तपुरवठा होतो आणि ती व्यक्ती शुद्धीवर येते. चक्कर येण्याची बरीच कारणं असतात. त्याविषयी...

✻ बराच काळ उन्हात राहिल्याने किंवा गर्दीत घुसमटल्याने चक्कर येऊ शकते. खूप जास्त व्यायाम केलानंतर तसंच तीव्र उन्हात फिरताना शरीरातलं पाणी कमी झाल्याने चक्कर येण्याची शक्यता असते. बराच वेळ उभं राहिल्याने किंवा पटकन उठल्यानेही चक्कर येऊ शकते.

✻ ताणामुळे रक्तदाब कमी होतो आणि चक्कर येते. अचानक धक्का बसला तरी चक्कर येऊ शकते.

✻ माणसाला जागं ठेवण्यासाठी तसंच कार्य सुरळीत सुरू राहण्यासाठी मेंदूला रक्तातून साखरेचा पुरवठा होणं गरजेचं असतं. रक्तातल्या साखरेचं प्रमाण कमी झालं तर मेंदूला योग्य प्रमाणात ऊर्जा मिळत नाही. यामुळे चक्कर येऊ शकते.

✻ ॲनिमिया म्हणजे रक्तात लोहाचं प्रमाण कमी असेल तर चक्कर येऊ शकते. ॲनिमियामुळे रक्तातल्या लाल पेशींचं प्रमाण कमी होतं. यामुळे मेंदू तसंच इतर टिश्यूंना कमी प्रमाणात ऑक्सिजनचा पुरवठा होतो.



## दोस्त हे मस्त

### ब्लू ड्रॅगन

ग्लॅउकस ॲटलांटिकस नावाचा एक प्राणी आहे. त्याला ब्लू ड्रॅगन असंही म्हटलं जातं. महासागरांमधल्या गरम पाण्यात हा प्राणी आढळतो. ब्लू ड्रॅगन पाण्यावर तरंगताना आढळतात. त्यांच्या पोटात हवेने भरलेली पिशवी असते. त्यामुळे ते पाण्यावर तरंगू शकतात. निळ्या रंगाचा हा प्राणी डोळ्यात भरतो.



## खादाडी

### घरीच बनवा कॉर्न चाट

बाजारात कणसं मिळतात. मिळतील तेव्हा कणसे खायला हवी. या मक्यांचा वापर करून तुम्ही चटपटीत चाट बनवू शकता. यासाठी अर्धा कप स्वीट कॉर्न उकडून घ्या, बारीक चिरलेला कांदा, चिरलेला टोमॅटो आणि गाजर, तिखट, चाट मसाला, शेव, लिंबाचा रस, कोथिंबिर, चमचाभर बटर आणि मीठ हे साहित्य घ्या. बटरमध्ये मके परतून घ्या. एका भांड्यात काढा. आता त्यात उरलेलं साहित्य घाला. वरून शेव घाला. मस्त हलवून घ्या आणि खा.



## लाईफस्टाईल

### लाभ गाणी ऐकण्याचे

गाणी ऐकल्यामुळे ताणतणाव कमी होतात. पण त्याचे इतरही काही लाभ आहेत. गाणी ऐकल्यामुळे मेंदूशी संबंधित विकार दूर ठेवता येतात. खेळताना किंवा व्यायाम करताना गाणी ऐकल्याने शरीराची क्षमता वाढते. आपण चांगल्या पद्धतीने व्यायाम करू शकतो. गाणी ऐकल्याने लहान मुलांमध्ये अभ्यास करण्याची क्षमता वाढते. मुलं गोष्टी चांगल्या प्रकारे लक्षात ठेऊ शकतात. त्यामुळे तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा आवडीची गाणी नक्की ऐका.



## योगा टाईम

### उत्कटासन

उत्कटासन नावाचं एक आसन आहे. पायांची आणि खांद्यांची क्षमता वाढवण्यासाठी हे आसन केलं जातं. यासाठी सरळ उभे राहा. श्वास घ्या. हात वर करा आणि शरीर ताणा. गुडघे थोडे वाकवून उभे राहा. श्वास घेत राहा आणि काही वेळ या स्थितीत उभे राहा. श्वास आत घेताना पाय सरळ करा आणि श्वास सोडताना हात खाली घ्या.



# कलासक्त

# शाश्वत विकासाच्या केंद्रस्थानी सर्वसामान्य पाहीजे

आविष्कार देसाई



रायगड जिल्हा औद्योगिकरणाच्या मार्गावर वाटचाल करु लागला आहे. त्याला आता ६० वर्षाहून अधिक कालावधी लोटला आहे. विकास हा फक्त औद्योगिकरणातूनच होतो असे नाही, तर पर्यटन, शेती आणि मत्स्यव्यवसायही जिल्ह्यातील नागरिकांच्या उन्नतीसाठी पुरेसे आहे. परंतु ग्रामपंचायतीपासून संसदेपर्यंत असलेल्या अनेक लोकप्रतिनिधींच्या नजरेतून शास्वत विकासाचा मुद्दा सुटल्याचे स्पष्ट दिसून येते. पारंपरिक विकासाच्या संकल्पना बदलल्या आहेत. सर्वच स्तरावर प्रशासनातही मोठे बदल होत आहेत. यापुढे रायगडच्या उन्नतिबाबत भाषणांमध्ये पोकळ गप्पा न मारता खरोखर विकास करावयाचा असेल तर रायगडच्या माणसांचा, समुहांचा अभ्यास, रायगडच्या अर्थव्यवस्थेचे आकलन आणि प्रशासनावर घट्ट पकड ही कौशल्ये नेतागिरी करणाऱ्यांना आत्मसात करावी लागणार आहेत. यासाठी शश्वत विकासाच्या केंद्रस्थानी सर्वसामान्याला ठेवणे क्रमप्राप्त आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास रायगड जिल्ह्याच्या नावातच भरलेला आहे. मुंबई, ठाण्यातून पनवेल ते पोलादपूरमार्गे तळकोकणात घेऊन जाणारा हा रायगड. पनवेल, उरणचा माणूस अलिबागसोबत काही नाते सांगतो, ते महाड श्रीवर्धन पेणशी सांगतो. रायगडचा म्हटलं की माणगाव पण आमचेच नी मुरूडपण आमचेच. कुठे काही समस्या आली की रायगडकर म्हणून येथील १५ तालुक्यांमध्ये लोकांना काळजी वाटते, तर कोणता आनंदाचा प्रसंग कोणत्याही तालुक्यात असो आपलेपणाचा आनंद प्रत्येक रायगडकराला वाटतो. हिच या रायगडच्या मातीची खासीयत आहे.

अलिबाग, कर्जत मुरुडचा विकास झाला तरी महाडकर आनंदी असतो. उरण, पनवेल, कर्जत खालापूर मुंबईशी नाते जोडू पहात असले तरी संपूर्ण रायगडकरांना अभिमानच वाटत असतो. इतकी विविधता रायगडमध्ये आहे की त्या विविधतेचे आकलन होणे आव्हानात्मक आहे. ही विविधता भौगोलिक तर आहेच परंतु सांस्कृतिकही आहे. रायगडकरांच्या भविष्याचा विचार कुणी करीत असेल तर ते खूप आव्हानात्मक काम आहे. पूर्वी अनेक लोकप्रतिनिधी रायगडला लाभले. किनारपट्टीतील गावांमध्ये आगरांमध्ये शेतीचा विकास करणारे, बागांचा विकास करणारे आगरी समूहाचे लोक. त्यांनी तर निसर्गाशी दोन हात करून माणसाला मीठ, मासा, भाकरी दिली. डोंगराळ भागातील आदिवासी समाजाचे खऱ्या अर्थाने कृषी संस्कृतीत फार मोलाचे योगदान आपण कोणीच विसरुन चालणार नाही. मैदानी भागातील कुणबी समाज त्यांनीही पोलादपूर, महाड, माणगाव, नागोठणे भागात नैसर्गिक आपत्तींशी सामना करीत शेती, बागायती विकसित केली. हे चित्र साधारणपणे प्राचीन काळापासून स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंत होते. त्यानंतर मात्र औद्योगिकरणाचा एक प्रवाह सुरु झाला आणि हे विभाग कृषी अर्थकारणातून औद्योगिक समाजाकडे वाटचाल करत असल्याचे चित्र दिसू लागले. या ठिकाणीच समृद्धीची गणिते चुकल्याचे आज दिसून येते. १९६० पासून जिल्ह्यात सुरु झालेले औद्योगिकरण बदल घडवून आणू लागले. त्यामध्ये जिल्ह्याची विकासाची ठेवणच बिघडली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. पर्यटन व्यवसायाला पूरक असलेले विभाग आणि शेतीला फायदेशीर असलेले विभाग रासायनिक उद्योगांनी गिळून टाकले. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कंपन्यासाठी जमिनींचे संपादन करण्यात आले. त्यामुळे कंपन्या आल्या त्यांनी शेती घशात घातली आणि काही कालावधीनंतर त्या कंपन्या बंदही पडल्या. त्या माध्यमातून तात्पुरता विकासाने उसळी घेतल्याचे दिसून आले. यामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले याकडे मात्र राजकर्त्यांनी सोयीस्करपणे दुलर्क्ष केले. त्यामुळे शेतकरी काही वर्ष विकासापासून मागे खेचला गेला. रायगडकरांसाठी आतापर्यंत आलेले आणि येवू घातलेले प्रकल्प हे दुःखाश्रू ठरत आहेत. हे चित्र आपल्याला जिल्ह्यात स्पष्टपणे दिसत आहे.




आज बहुतांश शेतकरी कंपन्यांच्या नादात भूमिहन झाला आहे. शेती गेली, नोकरी गेली अशी अवस्था त्याची झाली आहे.

उरण, पनवेल अशा नवी मुंबईशी जुडलेल्या भागात शेतकरी उद्ध्वस्त झाला. प्रकल्पग्रस्तांवर रिक्षा चालवण्याची नी कंपन्यांच्या गेटवर वॉचमन म्हणून उभे राहून परप्रातियांना सलाम ठोकण्याची वेळ आली. अशीच परीस्थिती अलिबाग, महाड, रोहा तालुक्यांमध्येही प्रकल्पग्रस्तांवर आलेली आहे. बळीराजा हा गुलाम कधी झाला हे ना माणसांना कळले ना लोक प्रतिनिधींना कळले. जमीनीच्या व्यवहारात दलालीत करुन काही लोकांकडे प्रचंड पैसा आला. सुरुवातीला चळवळी, चिंतनातून लोकनेत्यांचा जन्म व्हायचा आता मात्र, अशाच दलालांचा, ठेकेदारांचा राजकारणात प्रवेश झाला. त्याचमुळे रायगडच्या विकासाची धोरण सारखी सारखी चुकत आहेत. आपण या चुका सुधारणार आहोत की, तसेत राहणार आहोत. हा देखील महत्वाचा प्रश्न आहे. काँग्रेससदृश्य विचारांनी विकासाचा पाया घातला परंतु भाजपप्रणित विकासाच्या विचारांनी केंद्र आणि राज्यात सत्ता मिळवलेली आहे. रायगडवरही त्याचा परीणाम झालेला आहे. विकासाचा पाया घालणाऱ्यांनी सम स्याही निर्माण केलेल्या आहेत. त्याचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन रायगडकरांना करावे लागणार आहे. सध्या नव्या सत्ताकारणातील नेत्यांना रायगडमध्ये नक्की कोणत्या समस्या आहेत. याचा परीपूर्ण अभ्यास करावा लागणार आहे. आता उजवीकडे कल असलेले सत्तेत आहेत. ते तर उघडपणे उद्योगपतींचे समर्थन करतात.

प्रशासनाला पारदर्शक व लोकाभिमुख करण्यासाठी अनेक चळवळी रायगड जिल्ह्याने पाहिलेल्या आहेत. रायगडचे महान नेते नानासाहेब पुरोहित, नारायण नागू पाटील यांच्या विचारांचे परीशीलन नेत्यांनी करावे. रायगडकर नेमका वर्मावर बोट ठेवतो. म्हणूनच महसूल न्यायालये बंद करा, अशी मागणी येथून होते. सातबारा, फेरफार आणि तलाठी दप्तरातील चुकांवर निर्णय देणारे तहसीलदार, प्रांताधिकारी असे खाबूगिरी करणारे बाबू लोक न्यायालये चालवितो, असे म्हणतात. मग माननीय न्यायालयांप्रमाणे त्याची दारे खुली का नसतात आणि आम जनतेला त्यांच्या न्यायालयात प्रवेश का नसतो. हा खरा प्रश्न आहे. पायाभूत सुविधा लोकांना त्वरीत हव्या आहेत. कामाची गुणवत्ता हवी. धरणे, महामार्ग, वीज, पिण्याचे शुद्ध पाणी, आरोग्य व्यवस्था यांच्यावरील नियंत्रण ठेवणारे प्रशासन रायगड जिल्ह्यात सक्षम आणि कार्यतत्पर असणारे पाहीजेत. शेतीची जागा आता कारखाने गिळंकृत करत आहेत. गावा-गावांममध्ये आद्यौगिक विकास झाला म्हणजे आर्थिक, सामाजिक सुबत्ता आली असे म्हटले जाते. मात्र कारखान्यांमुळे होणाऱ्या प्रदुषणाने अन्नसाखळीच धोक्यात आली आहे. नियम, निकष हे शब्द फक्त कागदावरच चांगले असतात. त्याची अंमलबजावणी केल्यास त्याचा थेट विपरीत परिणाम कारखान्यांच्या ताळेबंदावर होतो. रायगड जिल्ह्यातही विकासाची व्याख्या बदलली आहे. त्यामुळे विकासाच्या नावावर निर्सगालाच थेट आव्हान देण्यात येत असल्याने अन्न साखळी धोक्यात आली आहे. याची किंमत पुढील पिढीला चुकती करावी लागणार असल्याचे चित्र आहे. **

## समाज हादरवणारा रहस्यमय
# 'ॲसिड' चित्रपट अल्ट्रा झकास ओटीटीवर रुजू!



राम कोंडीलकर

स्त्रीच्या सौंदर्यात भर म्हणजे तिचा गोजिरवाणा चेहरा. मात्र, या चेहऱ्याला कोणी इजा पोहोचवून तिची विद्रुपावस्था केली तर? या विद्रुपावस्थेचा कोणी सूड घेऊ लागला तर? अशीच एक भयाण आणि समाजाला काळं फासणारी कथा असणारा दाक्षिणात्य 'ॲसिड' (आघात) चित्रपटाचा अल्ट्रा झकास या मराठी ओटीटीवर ३ मे २०२४ रोजी रुजू झाला असून, सध्या हा चित्रपट अल्ट्रा झकास ओटीटीवर विशेष ट्रेंडिंग होत आहे.

केरळमधील ॲसिड हल्ल्यातील गुन्हेगार राज्याच्या विविध भागातून बेपत्ता होतात. ॲसिड हल्ल्यात बळी पडलेल्या मुलींच्या घरासमोर या गुन्हेगारांना त्यांच्या कापलेल्या लिंगासह टाकण्यात येते. या वारंवार घडणाऱ्या घटना समाजात व्हायरल होतात आणि लोक त्यावर आपल्या प्रतिक्रिया देऊ लागतात. मात्र, ही कृत्ये करणाऱ्या अज्ञात कोण आहे, याचा सुगावा लागत नाही. नेमका कोण असेल हा अज्ञात, हे चित्रपटात कळणार आहे. चित्रपट हा मूळ मल्याळम भाषेत असून, याचे मराठी रुपांतर प्रेक्षकांना पहायला मिळणार आहे.

"समाजात विक्षिप्त मानसिकतेचे लोक आणि त्यांचे विक्षिप्त कृत्य मनाला हेलावून टाकणारे असतात. समाजातील ही विक्षिप्तता दाखवणारा 'ॲसिड' चित्रपट प्रेक्षकांना सादर करून जागरूकता निर्माण करण्याचा आमचा प्रयत्न आहे." असे अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेंनमेंट प्रा. लिमिटेडचे सीईओ सुशीलकुमार अग्रवाल म्हणाले. ••

# सुनील कपूर ते शक्ती कपूर
## एक रोमहर्षक जीवनप्रवास

श्रीराम शेटये

मानवी जीवन अगम्य आहे. अनंत आभासांनी भरलेले आहे. तारूण्याच्या उंबरठ्यावर आपण एक दिशा ठरवतो. आपल्याला या मार्गाने जायचे आहे. हे करिअर म्हणून निवडायचे आहे. पण, आपले नशीब आपल्याला कधी कधी भलत्याच मार्गांवर घेऊन जाते. ज्याची आपण कधी कल्पनादेखील केलेली नसते.

पंजाबमधील सुनील कपूर नावाचा एक होतकरू तरूण. सर्वसामान्यांसारखी साधी स्वप्न घेऊन जगणारा. खूप अभ्यास करून बी.कॉम.पर्यंतचे शिक्षण घेतो. वडिलांच्या परवानगीने 'ट्रॅव्हल्स अँड टुरिझम'चा कोर्स पूर्ण करतो. या क्षेत्रात व्यवसाय करायचा एवढंच स्वप्न असते. वडील सिकंदरलाल कपूर यांचे दिल्लीत 'टेलरिंग अँड डिझायनिंग'चे शॉप होते. याच शॉपमधील अर्ध्या भागात वडिलांनी आपल्याला ट्रॅव्हलिंग व्यवसाय करण्यासाठी जागा द्यावी, असे सुचवतो. पण, जेव्हा कोर्स पूर्ण झाल्यावर सुनीलने वडिलांना याबाबत आठवण केली, तेव्हा वडिलांनी त्याची मागणी फेटाळून लावली. वडील म्हणाले, तुला माझ्याच व्यवसायात यावे लागेल. नाहीतर लोक म्हणतील बाप-लेकामध्ये बटवारा झाला. सुनील नाराज झाला. कॉलेज पूर्ण झाले तरी कॉलेजच्या कँटिनमध्ये अजूनही माजी विद्यार्थी बसत असत. सुनीलचा दिल्ली युनिव्हर्सिटीमधील एक मित्र थिएटर ॲक्टर होता. तो फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडियासाठी फॉर्म भरत होता. त्याने सुनीलला काही माहिती न पडू देता त्याचाही फॉर्म भरून टाकला.

एक दिवस शासनाच्या फिल्म इन्स्टिट्यूड ऑफ इंडियामधून पत्र आले. सुनीलला मुलाखतीसाठी बोलावले होते. त्याला प्रश्न पडला सिनेमात काम करायचा विचार आपण कधी स्वप्नातही केला नव्हता. हे आपल्या मित्रांनीच केले असावे? पण, आपल्याला अभिनयातला ध किंवा मा येत नाही, तेव्हा आपण यासाठी जाणार नाही, असे त्याने मित्रांना सांगून टाकले. पण, मित्रांच्या आग्रहाखातर टाईमपास म्हणून तो परीक्षेसाठी गेला. संपूर्ण भारतातून पंचेचाळीस हजार अर्ज आले होते. त्यातून फक्त दहा मुलांची निवड होणार होती. सुनीलने मनाशी ठरविले, आपले इथे काहीच होणार नाही. त्याच्या मनावर तणाव नव्हताच, टाईमपास करून परत यायचे. एवढ्या मुलांमध्ये आपला नंबर लागणारच नाही. प्रथम लेखी परीक्षा होती. सोपे प्रश्न होते, ते सुनीलने सोडवले. मग ऑडिशन द्यायची होती.

सुनील आत गेला. हॉलमध्ये चार खुर्च्या आणि टेबल मांडलेले होते. समोर दिग्गज अभिनेते अशोक कुमार, अभिनेत्री कानन कौशल, दिग्दर्शक ऋषीकेश मुखर्जी हे मान्यवर ऑडिशन घेण्यासाठी बसलेले होते. त्यांना पाहून तो भारावून गेला.

आत गेल्यावर त्याने सर्वांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. तो परीक्षकांना प्रामाणिकपणाने म्हणाला,



मला अभिनयातलं काही येत नाही. मला ॲक्टर वैगरे बनायचं नाही. मला मित्रांनी इथे फसवून आणलयं, तेव्हा मी जातो आता. परीक्षक म्हणाले, लाईन मोठी आहे, जे काय ऑडिशन द्यायचे ते पटापट देऊन जा. सुनीलला आपलं काही होणार नाही हे माहिती होतेच. त्यामुळे मनावर कोणतेही दडपण न ठेवता जे करता येईल ते हा! ही!! हू!!! करुन परीक्षकांना परत एकदा नमस्कार करून तो बाहेर पडला.

एक महिन्यानंतर फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामधून परत पत्र आले. सुनीलची निवड झाली होती. दिल्लीतून फक्त दोन मुलांची निवड झाली होती. दुसरे नाव होते नसरुद्दीन शहा. सुनील आता 'सातव्या अस्मान'वर होता.

दिल्ली ते मुंबई प्रवासादरम्यान त्याची दोस्ती योगायोगाने अनिल बर्मन याच्याशी झाली. तो सुनीलला आपल्या बहिणीच्या घरी घेऊन गेला. अनिल बर्मनची बहीण विनोद खन्नाचा भाऊ प्रमोद खन्ना यांची पत्नी होती. त्यामुळे योगायोगाने तेथे विनोद खन्ना आणि राकेश रोशन सुनीलला भेटले. दुसऱ्याच दिवशी विनोद खन्नाचा भाऊ प्रमोद खन्ना आणि राकेश रोशन हे दोघे सुनीलला राकेश रोशनच्या गाडीतून फिल्म इन्स्टिट्यूट ऑफ इंडियामध्ये घेऊन गेले. रात्रीचे आठ वाजले होते. गाडी बॉईज हॉस्टेलच्या गेटवर थांबली. तिथे फाटकी लुंगी नेसलेला एक तगडा तरुण दारातच उभा होता. त्याने राकेश रोशनला बघितल्यावर तो म्हणाला, "सर, मै आपका बहुत बडा फॅन हूं".

सुनीलला सोडून राकेश रोशन आणि प्रमोद खन्ना गाडी घेऊन बाहेर निघाले. गाडी बाहेर गेल्यावर तो तरूण सुनीलला म्हणाला, "मेरा नाम मिथुन चक्रवर्ती है, मै यहां का सिनीयर हूं". असे म्हणून त्याने सुनीलला पकडले. समोरून विजेयेंद्र घाटगे आला. दोघांनी पकडून एका रूमम ध्ये घेऊन गेले. रूमचा दरवाजा आतून बंद केला. त्यांनी सुनीलला खाली खुर्चीत आपटले. रूममधील लाईट बंद केली. डोक्यावरची एक लाईट चालू केली. डोक्यावरचे केस पकडून दोन्ही कानापासून टाळूपर्यंत दोन्ही बाजूचे केस कैचीने कापले. थंडीचे दिवस होते, स्विमिंग पूलमध्ये नेऊन दहा वेळा पाण्यात फेऱ्या मारायला लावल्या व मारहाण केली. आपल्यासोबत होत असलेल्या या रॅगिंगमुळे सुनील अक्षरशः रडला. गयावया करू लागला. म्हणाला, 'मला नाही बनायचं हिरो, मी हात जोडतो, सोडा मला'. मी उद्या परत दिल्लीला जातो, असे म्हणाला. तेव्हा मिथुनला त्याची थोडी दया आली. तो सहकाऱ्यांना म्हणाला, आता बस करा, याची बाकीची परेड उद्या करूया. सगळे आपापल्या रूममध्ये परत गेले तसे मिथुन परत आला. तो म्हणाला, सुनील मी तुला एका रुममध्ये बंद करून बाहेरून टाळे लावतो म्हणजे सगळ्यांना वाटेल तू रूममध्ये नाहीस बाहेर गेलास. नाहीतर रात्रभर तुझ्यासोबत एवढी परेड होईल की रॅगिंगला कंटाळून तुझ्याकडे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व आल्यावर मिथुन म्हणाला, आता खूप झाली रॅगिंग याची, बिचाऱ्याला सोडा आता.

कोर्स पूर्ण होता होता अर्जुन हिंगोरानी यांनी 'खेल खिलाडी का' या चित्रपटात प्रथम संधी दिली. मुंबईत राहायला घर नव्हते. सुनील सांताक्रुजला पेईंग गेस्ट म्हणून राहात होता. चित्रपट इंडस्ट्रीत त्याचे कोणीही नातेवाईक नव्हते. तरीही त्याचे नशीब बलवान होते. विनोद खन्ना यांची एका दिवसाची झालेली ओळख, पण तरीही त्याची दया आल्यामुळे विनोद खन्ना यांनी आपले जुहू येथील रिकामे घर एक रुपयाही भाडे न घेता त्याला रहायला दिले.

दादरला रुपतारा स्टुडिओमध्ये सुनील दत्त शूटिंग करीत होते. एक दिवस मोठा धीर करून सुनील त्यांना भेटायला गेला. दरवाजा ठोकून आत गेला. आपले फोटोसेशन त्याने त्यांना दाखवले आणि चित्रपटात संधी देण्यासाठी विनंती केली. त्यांनी त्याचा चेहरा पहिला आणि म्हणाले, तुझ्या डोळ्यांमध्ये खलनायकी ढंग आहे, तू मला वांद्रे येथील ऑफिसमध्ये येऊन भेट. त्याला खलनायकाच्या भूमिकेसाठी साईन केले.

नर्गिस व सुनील दत्त यांनी खलनायकाला शोभेल असे शक्ती कपूर असे त्याचे नामकरण केले. कार्यालयात पेढे वाटून नामकरण करण्यात आले. तिथूनच सुनील कपूरचा शक्ती कपूर झाला. हे नाव इंडस्ट्रीत गाजू लागले. मग त्याने मागे वळून पाहिले नाही. कादरखान यांच्या सल्ल्यावरून विनोदी भूमिकाही साकरल्या. प्रत्येक वेळेस नशिबाने साथ दिल्याने सुनील कपूर ते शक्ती कपूर हा प्रवास रोमहर्षक झाला. इतके भाग्यशाली नशीब जसे कल्पवृक्षाच्या झाडाखाली बसल्यासारखे. शक्ती कपूरच्याच शब्दात "खुदा मेहरबान तो गधा पेहलवान." ••

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)